# महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

(स्वायत्त) (ISO 9001:2015) (ISO/IEC 27001:2013)

अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान पदविका

## शिक्षण पुस्तिका

(Learning Material)

# बेसिक इलेक्ट्रॉनिक्स

Basic Electronics

(312314)

## अणुविद्युत अभियांत्रिकी गट

मराठी – इंग्रजी (द्विभाषिक) माध्यम

(अभियांत्रिकी व तंत्रज्ञानातील द्वितीय सत्र पदविका)

**(Learning Material)**

# बेसिक इलेक्ट्रॉनिक्स

**Basic Electronics**

(312314)

अणुविद्युत अभियांत्रिकी गट

**मराठी – इंग्रजी (द्विभाषिक) माध्यम**

**(अभियांत्रिकी व तंत्रज्ञानातील द्वितीय सत्र पदविका)**


**महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई**

**(स्वायत्त) (ISO 9001:2015) (ISO/IEC 27001:2013)**

## मार्गदर्शक

**किशोर प्रल्हाद अकोले**
प्रभारी विभागप्रमुख, अणुविद्युत अभियांत्रिकी

## प्रमुख समन्वयक

**विक्रांत भास्करराव जोशी**
प्राचार्य

## समन्वयक

**दिना राकेश शाह**
विभागप्रमुख, अणुविद्युत आणि दूरसंचार अभियांत्रिकी

## लेखक

**दिपक अविनाश कुलकर्णी**
विभागप्रमुख, अणुविद्युत अभियांत्रिकी

**पूजा श्रीशाली माळी**
अधिव्याख्याता, अणुविद्युत अभियांत्रिकी

**निर्मला नितीन कांबळे**
अधिव्याख्याता, अणुविद्युत अभियांत्रिकी

**वैशाली अविनाश राजेशिर्के**
अधिव्याख्याता, अणुविद्युत अभियांत्रिकी

**शीतल मनीष कोकाटे**
अधिव्याख्याता, अणुविद्युत अभियांत्रिकी

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO: ९००१:२०१५) (ISO/IES: २७००१-२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र.: ०२२-६२५४२१७० / १६१

Email : director@msbte.com Web : www.msbte.org.in


## प्रास्ताविक

महाराष्ट्र राज्यातील पदविका स्तरावरील तंत्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांचे रोजगार कौशल्य विकसित करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याकरिता महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ कटिबद्ध आहे. उद्योगधंद्यातील बदलत्या तंत्रज्ञानाशी संबंधित गरजा लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाकडून पदविका अभ्यासक्रम वेळोवेळी अद्यावत करण्यात येतो. अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम शिकत असतांना संकल्पनात्मक ज्ञान, सुसंगत संदर्भ, प्रश्न विचारणे, विश्वसनिय पुरावे, कारणमीमांसा आणि सुस्पष्ट निकष यांचा वापर करून अर्थाची उकल करण्याची, विश्लेषण व मूल्यमापन करण्याची तसेच तर्काने अनुमान काढण्याची क्षमता म्हणजेच चिकित्सक विचार विद्यार्थ्यांमध्ये अधिक दृढ होतील असा मला विश्वास आहे. जेव्हा विद्यार्थी ज्ञान मिळवण्याच्या माध्यमाशी पूर्णपणे परिचित आणि सोयीस्कर असतात, तेव्हा त्यांच्यासाठी वर्गातील चर्चेत भाग घेणे सोपे होते, संकल्पनात्मक व सैद्धांतिक बाबींचे आकलन परिपूर्ण होते, संज्ञानात्मक क्षमता सुधारते आणि त्यांचा आत्मविश्वास देखील वाढतो या सर्व गोष्टींचा विचार करून मंडळाकडून शैक्षणिक सामुग्रीची निर्मिती करण्यात आलेली आहे. भारत देश हा खेड्यापाड्यातून विकसित झालेला देश असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण घेतांना भाषेचा अडसर न येता तांत्रिक बाबींचा आशय समजून घेणे शक्य होईल या दृष्टिकोनातून महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने पदविका स्तरावरील तांत्रिक शिक्षणाकरीता विद्यार्थ्यांना मराठी-इंग्रजी द्विभाषिक माध्यमाचा पर्याय शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून उपलब्ध करून दिलेला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० प्रादेशिक भाषेतील शिक्षणास प्रोत्साहन देते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना तांत्रिक अभ्यासक्रमांसाठी प्रादेशिक भाषांतुन शिक्षणाचे माध्यम निवडता येते. सदर धोरणामुळे प्रादेशिक भाषांमध्ये तांत्रिक सामग्री आणि अभ्यास सामग्रीचा विकास आणि भाषांतर निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्यास अनुसरून मंडळाने मराठी-इंग्रजी द्विभाषिक माध्यमाचा पर्याय द्वितीय व तृतीय वर्षाकरिताही उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच त्याकरिताची शैक्षणिक सामग्रीही संबंधीत भागधारकरांना उपलब्ध करून देण्यात येत आहे.

पदविका स्तरावरील तंत्रशिक्षण अधिक दर्जेदार करण्यासाठी महाराष्ट्रातील अनुभवी व तज्ञ अध्यापकांनी व्यवहारिक मराठी भाषा व इंग्रजी भाषेतील तांत्रिक शब्दावली यांचा वापर करून मराठी - इंग्रजी भाषेचा सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. मंडळाच्या स्तरावर गठीत सुकाणू समितीमार्फत सदर शैक्षणिक सामुग्रीचा दर्जा, तसेच इतर बाबींची तपासणी करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर शैक्षणिक सामुग्री अधिक सम्पन्न झालेली असून विद्यार्थी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सुसंवादी आणि सर्वांगीण विकास साधतील. परिणामतः विश्वस्तरीय मनुष्यबळाच्या गरजा पूर्ण करण्यात महाराष्ट्र राज्य अग्रेसर राहील व पर्यायाने राष्ट्रनिर्मिती करीता निश्चितच हातभार लागेल, असा मला विश्वास आहे.

अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील प्रमुख विषयांची मराठी-इंग्रजी द्विभाषिक शैक्षणिक सामुग्री बनविण्यासाठी अध्यापक व सुकाणू समितीचे सदस्य यांनी दर्शविलेले समर्पण व वचनबद्धता कौतुकास पात्र आहे, या सर्वांचे मी मनः पूवक अभिनंदन करतो!

(प्रमोद नाईक)
संचालक
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | युनिटचे नाव | पान क्र. |
|---|---|---|
| 1 | डायोडचे अनुप्रयोग<br>**Applications of Diode** | **1-19** |
| 2 | बायपोलर जंक्शन ट्रांझिस्टर<br>**Bipolar Junction Transistor** | **20-36** |
| 3 | **BJT** प्रवर्धक<br>**BJT Amplifiers** | **37-49** |
| 4 | फील्ड इफेक्ट ट्रांझिस्टर<br>**Field Effect Transistor** | **50-75** |
| 5 | विद्युत नियामक आणि पुरवठा उपकरण<br>**Regulators and Power supply** | **76-89** |

# युनिट - 1
# डायोडचे अनुप्रयोग
# (Diodes Application)

**विषय निष्पत्ती (Course Outcome):**
अणुविद्युत सर्किट्समध्ये संबंधित डायोड वापरा.
Use relevant diode in electronics circuits.

**युनिट निष्पत्ती (Unit Outcome):**
1.a दिलेल्या डायोडच्या कार्याचे तत्त्व, वैशिष्ट्ये आणि वापराचे वर्णन करा.
Describe working principle, characteristics, and application of the given type of diode.
1.b दिलेल्या प्रकारच्या रेक्टिफायरच्या कार्याचे वर्णन करा.
Describe the working of given type of rectifier
1.c दिलेल्या फिल्टरच्या लहरी घटक ( रिपल फॅक्टर ), PIV आणि कार्यक्षमतेची गणना करा.
Calculate ripple factor, PIV, and efficiency of the given type of filter.
1.d रेक्टिफायर, फिल्टर सर्किटची आवश्यकता आणि कार्यांचे वर्णन करा.
Describe the need and working of rectifier filter circuit.

**परिचय:**

डायोड हा दोन टर्मिनल्स असलेला एक इलेक्ट्रोनिक्स घटक आहे ज्याद्वारे विद्युत प्रवाह फक्त एकाच दिशेने जाऊ शकतो. डायोड्सच्या मुख्य वापरांपैकी एक म्हणजे विद्युत प्रवाह एका दिशेने रोखणे आणि विद्युत प्रवाह दुसऱ्या दिशेने वाहू देणे. डायोडचे विविध प्रकार आहेत आणि हे डायोड अनेक प्रकारे वापरले जातात. सर्वात मूलभूत कार्य म्हणजे एसी विद्युत प्रवाहाला एकदिशेने पल्सेटिंग डीसी विद्युत प्रवाहामध्ये बदलणे. ते इलेक्ट्रिकल स्वीचमध्ये वापरले जातात आणि सर्ज प्रोटेक्टरमध्ये वापरले जातात कारण ते व्होल्टेजमधील स्पाइक रोखू शकतात. डायोड डिजिटल लॉजिक बनवण्यास मदत करतात. प्रकाश उत्सर्जित करणारे डायोड किंवा LEDs हे सेन्सर आणि लेसर उपकरणांमध्ये इतर अनेक प्रकाश प्रदीपन उपकरणांमध्ये वापरले जातात. झीनर डायोडचा वापर विद्युतदाब नियामक (रेग्युलेटर) म्हणून केला जातो

## 1.1 डायोडचे विविध प्रकार आणि त्यांचे मटेरियल्स. PN जंक्शन डायोड, झीनर डायोड, एलईडी,

**फोटो डायोड, शॉट्की डायोड: रचना (construction) , प्रतीक (symbol) , कार्यतत्त्व, अनुप्रयोग (applications) , फॉरवर्ड आणि रिव्हर्स बायसिंग आणि V-I वैशिष्ट्ये**

### 1.1.1 PN जंक्शन डायोड:

डायोड हा दोन-टर्मिनल एकध्रुवीय अणुविद्युत घटक आहे. डायोड विद्युतप्रवाह फक्त एका दिशेने वाहू देतो आणि तो विद्युतप्रवाहाला विरूद्ध दिशेने रोखतो. हा एका दिशेला कमी रोध (resistance) (आयडीयलि शून्य) देतो आणि दुसऱ्या दिशेने उच्च रोध (आयडीयलि इनफीनिटी) देतो.

**डायोडची रचना:**
N-टाइप आणि P-टाइप दोन्ही सेमीकंडक्टर एकत्र जोडून डायोड तयार होतो. हा घटक P-टाइप आणि N-टाइप सेमीकंडक्टर मटेरियलचे संयोजन आहे म्हणून त्याला PN जंक्शन डायोड असेही म्हणतात.
P-टाइप आणि N-टाइप लेयर्समध्ये एक जंक्शन तयार होते. हे जंक्शन PN जंक्शन म्हणून ओळखले जाते.
डायोडमध्ये दोन टर्मिनल असतात; एक टर्मिनल P-टाइप लेयरमधून घेतले जाते आणि त्याला एनोड(anode) म्हणून ओळखले जाते. दुसरे टर्मिनल N-टाइप मटेरियलमधून घेतले आहे आणि ते कॅथोड (cathode) म्हणून ओळखले जाते. खालील आकृती डायोडची बेसिक रचना दर्शवते.




**आकृती 1.1 - डायोड रचना आणि प्रतीक**

**डायोडचे कार्य (वर्किंग)**

N-टाइप रीजन मध्ये इलेक्ट्रॉन मेजॉरिटी चार्ज क्यारीयर्स आहेत आणि होल्स मायनॉरिटी चार्ज क्यारीयर्स आहेत. P-टाइप रीजन मध्ये, होल्स मेजॉरिटी चार्ज क्यारीयर्स असतात आणि इलेक्ट्रॉन हे मायनॉरिटी चार्ज कॅरीयर्स असतात.

N-टाइप मधील इलेक्ट्रॉन्स P-टाइप कडे जातील आणि ते जंक्शनजवळ एकत्रित होतील. त्याचप्रमाणे P टाइप मधील होल्स N टाइपकडे जातील आणि जंक्शनजवळ गोळा होतील. या प्रक्रियेला डिफ्युजन (diffusion) म्हणतात.

जंक्शनजवळ थोड्याच वेळात N बाजूस निगेटिव रीजन तयार होतो आणि P जवळ पॉझिटिव्ह रीजन तयार होतो. तयार झालेला हा रीजन डीपलिशन रीजन म्हणून ओळखला जातो. हे पुढील कोणत्याही डिफ्युजन प्रतिबंधित करते.

फॉरवर्ड बायस :

फॉरवर्ड बायस लागू करण्यासाठी बॅटरीचे धन टर्मिनल P- टाइप ला आणि ऋण टर्मिनल N-टाइप ला जोडलेले आहे.बायसिंग मुळे इलेक्ट्रिक फील्ड तयार होते जे संभाव्य डीपलिशन रीजन मुळे तयार केलेल्या इलेक्ट्रिक फील्ड च्या विरूद्ध कार्य करते म्हणून डीपलिशन रीजन ची रुंदी कमी होते.




**आकृती 1.2- फॉरवर्ड बियसिंग ऑफ डायोड**

जेव्हा DC विद्युतदाब स्रोत, पोटेंन्शीअल बॅरीयर पेक्षा जास्त असतो, तेव्हा पोटेंन्शीअल बॅरीयर पूर्णपणे एलिमीनेट होतो,बॅटरी होल्स आणि फ्री इलेक्ट्रॉन्सना जंक्शनकडे ढकलते. यावेळी इलेक्ट्रॉनमध्ये डीपलिशन प्रदेशातून (depletion region) जाण्यासाठी पुरेशी ऊर्जा असते आणि होल्ससह एकत्रित होते आणि परिणामी डायोडद्वारे विद्युत् प्रवाह (Current) प्रवाहित होतो, ज्याला फॉरवर्ड विद्युत् प्रवाह (Current) म्हणून ओळखले जाते.

रिव्हर्स बायस

रिव्हर्स बायस लागू करण्यासाठी बॅटरीच्या **ऋण** टर्मिनलला P **टाइप** ला आणि धन टर्मिनलला N **टाइप** ला जोडा.




**आकृती 1.3 - रीव्हर्स बियसिंग ऑफ डायोड**

एक इलेक्ट्रिक फील्ड तयार होते जे पोटेंन्शीअल बॅरीयर फील्डच्या समान दिशेने कार्य करते परिणामी फील्डची ताकद वाढते आणि बॅरीयर ची रुंदी(width) वाढते.

बॅटरीचे ऋण टर्मिनल होल्स ना आकर्षित करते आणि धन टर्मिनल फ्री इलेक्ट्रॉन्सना आकर्षित करते परिणामी ते जंक्शनपासून दूर जातात आणि डीपलिशन रीजन अधिक रुंद होतो ज्यामुळे उच्च रोध निर्माण होतो आणि विद्युतप्रवाह होत नाही.

परंतु लागू केलेला रिव्हर्स बायस जंक्शनमधील मायनॉरिटी चार्ज वाहकांना म्हणजे P टाइप मधील इलेक्ट्रॉन्स आणि N टाइप मधील होल्स साठी फॉरवर्ड बायस म्हणून कार्य करतो परिणामी थोड्या प्रमाणात रिव्हर्स लीकेज विद्युत् प्रवाह (Current) वाहतो.

जर रिव्हर्स विद्युतदाब जास्त प्रमाणात वाढला तर डायोडचा विद्युतदाब ब्रेकडाउन विद्युतदाब पर्यन्त पोहोचेल ज्यामुळे डायोडचे नुकसान होऊ शकते कारण या विद्युतदाबवर ॲव्हेलांच (Avalenche) प्रभावामुळे मोठ्या संख्येने चार्ज कॅरीअर्स निर्माण होतात त्यामुळे विद्युतप्रवाह वेगाने वाढतो. त्यामुळे डायोडला रिव्हर्स बायस असा अप्लाय केला जातो की तो ब्रेकडाउन रीजन ला जाणार नाही.

**डायोडची V-I वैशिष्ट्ये (Characteristics):**

सेटअप आकृती:




**आकृती 1.4 - सेटअप आकृती**

**वैशिष्ट्ये**




**आकृती 1.5 - V-I वैशिष्ट्ये (Characteristics)**

**अनुप्रयोग:**

1. रेक्टिफायर्स
2. क्लिपर सर्किट्स
3. क्लॅम्पिंग सर्किट्स
4. रिव्हर्स विद्युत् प्रवाह (Current) प्रोटेक्शन सर्किट्स
5. लॉजिक गेट्स मध्ये
6. विद्युतदाब मल्टीप्लायर्स

**1.1.2 झीनर डायोड:**

झीनर डायोड हा एक विशेष प्रकारचा P-N जंक्शन सेमीकंडक्टर डायोड आहे. त्याची रचना P-N जंक्शन डायोडसारखी आहे. तथापि, झीनर डायोड तयार करताना, रिव्हर्स ब्रेकडाउन विद्युतदाब 3V ते 200 V दरम्यान अचूकपणे समायोजित केले जाते. झीनर डायोड तयार करण्यासाठी जोडलेल्या अशुद्धतेची (इमपुरिटी) डोपिंग पातळी ब्रेकडाउन विद्युतदाबचे अचूक मूल्य समायोजित करण्यासाठी नियंत्रित केली जाते.




**आकृती 1.6 - डायोड चिन्ह.**

हे दोन टर्मिनल घटक आहे आणि टर्मिनल्स एनोड आणि कॅथोड आहेत. चिन्हातील बाण हे झीनर डायोडद्वारे विद्युत् प्रवाह (Current)च्या पारंपारिक दिशेकडे निर्देशित करते, जेव्हा ते फॉरवर्ड बायस केले जाते.

**फॉरवर्ड बायसिंग:**




**आकृती 1.7 - फॉरवर्ड बायस झीनर डायोड**

जेव्हा झीनर डायोडचा एनोड **DC** स्रोत च्या धन टर्मिनलशी जोडलेला असतो आणि कॅथोड ऋण टर्मिनलशी जोडलेला असतो**,** तेव्हा झीनर डायोडला फॉरवर्ड बायस केले जाते असे म्हणतात. फॉरवर्ड बायस्ड झीनर डायोड फॉरवर्ड बायस्ड **PN** जंक्शन डायोड सारखाच वागतो.

**रिव्हर्स बायसिंग:**




**आकृती 1.8 - रिव्हर्स बायस झीनर डायोड**

जेव्हा कॅथोड धन टर्मिनलशी जोडलेला असतो आणि एनोड DC स्रोत च्या ऋण टर्मिनलशी जोडलेला असतो, तेव्हा झीनर डायोडला रिव्हर्स बायसिंग म्हटले जाते. रिव्हर्स बायस स्थितीत झीनर डायोडचे ऑपरेशन PN जंक्शन डायोडपेक्षा बरेच वेगळे आहे.

**झीनर डायोडची V-I वैशिष्ट्ये (Characteristics):**

झीनर डायोडची V-I वैशिष्ट्ये दोन भागात विभागली जाऊ शकतात:

1. फॉरवर्ड वैशिष्ट्ये
2. रिव्हर्स वैशिष्ट्ये

**फॉरवर्ड आणि रीव्हर्स वैशिष्ट्ये सेटअप:**




**आकृती 1.9 - फॉरवर्ड आणि रीव्हर्स वैशिष्ट्ये सेटअप**

**फॉरवर्ड वैशिष्ट्ये: – झीनर डायोडची फॉरवर्ड वैशिष्ट्ये आकृति मध्ये दर्शविली आहेत. ती जवळजवळ p-n जंक्शन डायोडच्या फॉरवर्ड वैशिष्ट्ये सारखीच आहे.**




**आकृती 1.10 - V-I वैशिष्ट्ये**

रीव्हर्स बायस कॅरेक्टरीस्टीक्स (reverse bias characteristics):: –

झीनर डायोडची रीव्हर्स वैशिष्ट्ये P-N जंक्शन डायोडपेक्षा वेगळी आहेत. ही वैशिष्ट्ये खाली दर्शविल्याप्रमाणे आहेत:

1) जसजसे आपण रिव्हर्स विद्युतदाब वाढवतो, सुरुवातीला एक रिव्हर्स लीकेज विद्युत् प्रवाह (Current) "$I_0$" जो मायक्रो एम्पीयर (uA) मध्ये आहे तो प्रवाहित होईल. हा प्रवाह थर्मली जनरेट झालेल्या मायनॉरिटी वाहकांमुळे वाहतो.

2) रिव्हर्स विद्युतदाबच्या एका विशिष्ट मूल्यावर, रिव्हर्स विद्युत् प्रवाह (Current) अचानक वाढेल. ब्रेकडाउन झाल्याचे हे इंडिकेशन आहे. या ब्रेकडाउन विद्युतदाबला झीनर ब्रेकडाउन विद्युतदाब किंवा झीनर विद्युतदाब असे म्हणतात आणि ते $V_Z$ दर्शविले जाते.

3) झीनर डायोड तयार करताना P आणि N रीजन ची डोपिंग पातळी नियंत्रित करून $V_Z$ चे मूल्य अचूकपणे नियंत्रित केले जाऊ शकते.

4) ब्रेकडाउन झाल्यानंतर, झीनर डायोडमधील विद्युतदाब स्थिर राहतो.

5) रिव्हर्स ब्रेकडाऊन नंतर झीनर विद्युत् प्रवाह (Current)रोधकाला (R) जोडून नियंत्रित करणे आवश्यक आहे. जास्त तापमान झाल्यामुळे डिव्हाइसचे कोणतेही नुकसान टाळण्यासाठी हे आवश्यक आहे.

रिव्हर्स ब्रेकडाउननंतर, झीनर डायोडमधील विद्युतदाब स्थिर राहतो परंतु स्रोत विद्युतदाबवर अवलंबून विद्युत् प्रवाह बदलतो. विद्युतदाब रेग्युलेटर म्हणून वापरला जात असताना या रीजन मध्ये झीनर डायोड वापरला जातो.

**प्रश्न: आकृती 1.10 मध्ये दर्शविलेल्या सर्किटसाठी आउटपुट विद्युतदाब $V_0$, लोड विद्युत् प्रवाह (Current) $I_L$, झीनर विद्युत् प्रवाह (Current) $I_Z$ आणि झीनर डायोडमध्ये शक्तीच्या हानीची( power dissipation) गणना करा.**




**उत्तर:**

i)Vo=Vz =8V

ii) भार विद्युत् प्रवाह (load Current) IL = Vo/RL = 8/(10x1000) =0.0008 = 0.8 mA

iii) झीनर विद्युत (विद्युत् प्रवाह) Iz

Vo = Vin-Is.Rs

Is = (Vin- Vo)/Rs = (10-8)/100 =2/100 =0.02A आहे

$I_s=I_z+ I_L$

$I_z=I_s- I_L$=0.02 - 0.0008= 0.0192A

iv) पावरडिसिपेशन =$V_L$x $I_L$ = 8x 0.0008 = 0.0064 = 6.4mW

**1.1.3 लाइट एमिटइंग डायोड LED:**

लाइट एमिटइंग डायोड हा एक विशेष हेवीली डोप केलेला P-N जंक्शन डायोड आहे जो फॉरवर्ड बायस असताना उत्स्फूर्त रेडिएशन एमिट करतो. हे इलेक्ट्रिकल एनर्जि लाइटएनर्जिच्या रूपात रूपांतर करण्यासाठी वापरले जाते. ही एनर्जि लाइट रेजच्या स्वरूपात एमिट होईल.
जेव्हा त्यावर इलेक्ट्रिकल एनर्जि अप्लाय केली जाते तेव्हा एलईडी (LED) मधून प्रकाश बाहेर येतो .




**आकृती 1.11 - एलईडी प्रतीक**

**रचना:**




**आकृती 1.12- एलईडी रचना**

LED तीन लेयेर्स् नि बनलेले आहे जसे की P-टाइप सेमीकंडक्टर लेयर, N- टाइप सेमीकंडक्टर लेयर आणि ॲक्टिव रीजन. N- लेयरमध्ये मेजॉरिटी कॅरियेर्स् इलेक्ट्रॉन असतात तर P-लेयरमध्ये मेजॉरिटी कॅरियेर्स् होल्स असतात. ऍक्टिव्ह रीजन मध्ये समान प्रमाणात इलेक्ट्रॉन आणि होल्स आहेत म्हणून तेथे मेजॉरिटी

चार्ज कॅरियेर्स् नाहीत. ऍक्टिव्ह रीजनला डीप्लीशन रीजन असेही म्हणतात. या रीजन मध्ये इलेक्ट्रॉन आणि होल्स पुन्हा एकत्र होतात. जेव्हा इलेक्ट्रॉन आणि होल्स एकत्र होतात तेव्हा लाइट एमिट होतो. होल्स म्हणजे इलेक्ट्रॉनची अनुपस्थिती. ते हलत नाहीत. इलेक्ट्रॉन P-लेयरमधील होल्ससह शिफ्ट होतात आणि एकत्र होतात. म्हणून, P-लेयर एलईडीच्या वरच्यास्थानी ठेवण्यासाठी डिझाइन केले आहे

**एलईडीचे (LED) वर्किंग**




**आकृती 1.13 - एलईडी (LED)वर्किंग**

कोणत्याही सामान्य डायोडप्रमाणेच, LED किंवा लाइट एमिटग डायोड फक्त फॉरवर्ड बायसमध्ये कार्य करतो म्हणजेच कॅथोडच्या तुलनेत एनोड जास्त विद्युतदाबावर ठेवला जातो, किंवा एनोड धनटर्मिनलशी जोडलेला असतो आणि कॅथोड ऋण टर्मिनलशी जोडलेला असतो. N- रीजन मध्ये मेजॉरिटी चार्ज कॅरियर्स् इलेक्ट्रॉन्स असतात तर P- टाइप मध्ये मेजॉरिटी चार्ज कॅरियेर्स् होल्स असतात. त्याशिवाय, P-टाइप लेयरच्या तुलनेत N-टाइप लेयर खूप डोप केलेला आहे.

जेव्हा LED फॉरवर्ड बायस्ड असते, तेव्हा डीप्लीशन रीजन चे आकुंचन सुरू होते. त्यामुळे N-रीजन मधील इलेक्ट्रॉन्स आणि P-रीजन चे होल्स जंक्शनमधून जाऊ लागतात. ते डीप्लीशन रीजन मध्ये पुन्हा एकत्र येण्यास सुरुवात होते. त्याच्या रीकॉमबीनेशन दरम्यान, कंडक्शन बँड मधील इलेक्ट्रॉन होल्ससह पुन्हा एकत्र करून खालच्या व्हॅलेन्स बँड मध्ये येतात आणि लाइट एमिट करतात. रीकॉमबीनेशन नंतर, डीप्लीशन रीजनची विड्थ आणखी कमी होते आणि प्रकाशाची तीव्रता वाढते.

**सेमीकंडक्टर मटेरीयल्स यूज्ड:**

1. LED गॅलियम आर्सेनाइड (Ga,As), गॅलियम आर्सेनाइड फॉस्फाइड (Ga As P) आणि गॅलियम फॉस्फाइड (GaP) चे बनलेले असतात.
2. सिलिकॉन आणि जर्मेनियम वापरले जात नाहीत कारण ते मूलत: उष्णता निर्माण करणारी मटेरीयल्स आहेत आणि लाइट जनरेट करण्यात फारच कमी आहेत.

**V-I कॅरेक्टरीस्टीक्स सेट अप (Characteristics):**




**आकृती 1.14 - V-I Characteristics सेट अप**

LED ची V-I कॅरेक्टरीस्टीक्स सिलिकॉन डायोडच्या सेमीकंडक्टर सारखीच आहेत. LED चा कट इन विद्युतदाब सिलिकॉन डायोड पेक्षा खूप जास्त आहे.




**आकृती 1.15 - V-I क्यारेटरायस्टिक्स**

LED मुळात एक सामान्य डायोड म्हणून कार्य करते म्हणजेच ते विद्युतप्रवाह ला फॉरवर्ड दिशेने परवानगी देते, म्हणून वैशिष्ट्ये फक्त फॉरवर्ड विद्युतदाब आणि फॉरवर्ड विद्युत् प्रवाह (Current) दाखवतो. ॲक्टिव रीजन च्या उपस्थितीमुळे LED चे फॉरवर्ड विद्युतदाब सामान्य डायोडपेक्षा जास्त आहे. सुरुवातीला, LED विद्युत् प्रवाह कन्डक्ट करत नाही आणि जोपर्यंत फॉरवर्ड विद्युतदाब कट इन विद्युतदाबपेक्षा जास्त होत नाही तोपर्यंत लाइट जनरेट करत नाही. LED च्या वेगवेगळ्या रंगात कट इन विद्युतदाब वेगळा असतो. एकदा का एलईडीचे कन्डक्शन सुरू झाले की, विद्युतप्रवाह वेगाने वाढू लागतो जो एमिट होणाऱ्या प्रकाशाच्या तीव्रतेच्या थेट प्रमाणात असतो.




**आकृती 1.16 V-I वैशिष्ट्ये**

**फायदे**

1. LEDs लहान आकाराचे आणि हलक्या वजनाचे असतात. त्यामुळे डिस्प्लेची निर्मिती करताना छोट्या जागेत मोठ्या प्रमाणात एलईडी पॅक करणे शक्य आहे.
2. ते वेगवेगळ्या स्पेकट्रल रंगांमध्ये उपलब्ध आहेत.
3. दिव्यांच्या तुलनेत त्यांचे आयुष्य जास्त असते.
4. LED द्वारे एमिट होणारा लाइट त्यामधून वाहणाऱ्या विद्युतप्रवाहच्या प्रमाणात असतो. म्हणून अनुप्रयोगाच्या आवश्यकतेनुसार ब्राइटनेस बदलण्यासाठी LEDs मधून विद्युतप्रवाह नियंत्रित करू शकतो.
5. ते उच्च कार्य गतीसाठी योग्य आहेत कारण ते चालू किंवा बंद करण्यासाठी कमी वेळ घेतात.

**तोटे:**

1. आउटपुट पावरतापमानातील बदलांमुळे प्रभावित होते.
2. ओव्हर विद्युत् प्रवाह (Current) आणि रिव्हर्स विद्युतदाबमुळे ते सहजपणे खराब होतात.
3. त्यांच्या ऑपरेशनसाठी त्यांना मोठ्या पावरची आवश्यकता आहे.

**अनुप्रयोग:**

1. लाइट स्रोत म्हणून ऑप्टो कपलर्स (optocoupler) मध्ये.
2. इन्फ्रारेड रिमोट कंट्रोल्समध्ये.
3. विविध इलेक्ट्रॉनिक सर्किट्समध्ये निर्देशक म्हणून.
4. सेवेन सेगमेंट एलईडी अल्फान्यूमेरिक डिस्प्ले मध्ये वापरले जातात
5. फायबर ऑप्टिक कम्युनिकेशन सिस्टममध्ये लाइट स्रोत म्हणून वापरले जातात.

**शॉट्की डायोड:**

शॉट्की डायोड हे दोन टर्मिनल इलेक्ट्रॉनिक घटक आहे जे AC-DC कनवर्टर, रडार सिस्टीम, मिक्सर आणि डीटेकटर उपकरणे, इन्स्ट्रुमेंटेशन आणि A-D कनवर्टर यांसारख्या अनुप्रयोगांमध्ये वापरले जाते.




**आकृती 1.17 – प्रतीक**

**रचना**: मेटल आणि N-टाइप सेमीकन्डक्टर यांच्यामध्ये एक मेटल-सेमीकन्डक्टर जंक्शन तयार होतो. मॉलिब्डेनम, प्लॅटिनम, क्रोमियम किंवा टंगस्टन हे मेटल वापरले जातात. मेटल ची बाजू एनोड म्हणून कार्य करते आणि N-टाइप डायोडच्या कॅथोडचेकार्य करते.




**आकृती 1.18 – डायोड रचना**

**कार्य (working):**

या डायोडमध्ये इलेक्ट्रॉन मेजॉरिटी चार्ज कॅरियेर्स् आहेत. हे इलेक्ट्रॉन शेजारच्या मेटल मध्ये फ्लो होतात ज्यामुळे जास्त विद्युतप्रवाह होतो. इंजेक्टेड कॅरियेर्स् मध्ये मेटल च्या इलेक्ट्रॉनच्या तुलनेत उच्च कायनेटिक एनर्जि असल्याने त्यांना हॉट कॅरियेर्स् म्हणतात. जंक्शन सर्फेस जवळ कॅरियेर्स् चा हेवि फ्लो सिलिकॉन मटेरीयल मध्ये कॅरियेर्स्चा डीप्लीशन निर्माण करतो. हे नियमित वापरात असलेल्या P-N जंक्शन डायोडच्या डीप्लीशन रीजन सारखे आहे. मेटल मधील अतिरिक्त कॅरियर्स् दोन मटेरीयलच्या सीमेवर मेटलच्या आत एक निगेटिव्ह अडथळा (Nehative barrier) स्थापित करतील. परिणाम म्हणजे दोन मटेरीयल मध्ये सर्फेस चा अडथळा आहे जो पुढील कोणत्याही विद्युतप्रवाह ला प्रतिबंधित करतो.




**आकृती 1.19 - शॉट्की डायोड कार्य**

जर फॉरवर्ड बायस विद्युतदाब असेल तर निगेटिव्ह (Negative) ब्यारीयरची ताकद कमी होईल कारण बाह्य फॉरवर्ड बायास P बाजूकडील इलेक्ट्रॉनांना आकर्षित करेल. परिणामी जंक्शन ओलांडून इलेक्ट्रॉनचा जोरदार विद्युतप्रवाह सुरू होईल. हा फॉरवर्ड विद्युत् प्रवाह (Current) अप्लाइड पोटेंशीअल ब्यारीयरच्या पातळीद्वारे नियंत्रित केला जाऊ शकतो.

**V-I कॅरेक्टरीस्टीक्स (Characteristics)**




**आकृती 1.20 - V-I कॅरेक्टरीस्टीक्स**

मेटल-सेमीकंडक्टर शॉट्की डायोडचा **V-I** कॅरेक्टरीस्टीक्स आकार PN-जंक्शन डायोड सारखाच आहे, Metal Semiconductor-जंक्शन डायोड ज्या कोर्नर किंवा कट इन विद्युतदाबवर चालण्यास सुरुवात करतो ते 0.4 व्होल्टच्या आसपास खूपच कमी असते. या कमी मूल्यामुळे, सिलिकॉन शॉट्की डायोडचा फॉरवर्ड विद्युत् प्रवाह (Current) वापरल्या जाणाऱ्या मेटल इलेक्ट्रोडवर अवलंबून, सामान्य PN जंक्शन डायोडपेक्षा अनेक पटीने मोठा असू शकतो**.**

**फायदे:**

1. ऑन स्टेट फॉरवर्ड विद्युतदाब ड्रॉप कमी.
2. उच्च स्विचिंगची गती.
3. एकूण शक्तीचा अपव्यय पारंपारिक डायोडपेक्षा कमी आहे.

**तोटे:**

1. कमी रिव्हर्स ब्रेकडाउन विद्युतदाबामुळे कमी PIV असते.
2. जास्त लीकेज विद्युत् प्रवाह (Current).

**अनुप्रयोग:**

1. स्विचीग पावरसप्लाय.
2. AC- DC कन्व्हर्टर.
3. रडार प्रणाली.
4.कम्युनिकेशन उपकरणांमध्ये (मिक्सर आणि डिटेक्टर)

**1.2 डायोड वापरून रेक्टिफायर :**

**रेक्टिफायर**

रेक्टिफायर हे एक इलेक्ट्रॉनिक सर्किट (Circuit) आहे ज्याचा वापर AC विद्युतदाब किंवा विद्युत् प्रवाह (Current)ला एकध्रुवीय (Unidirectional) DC विद्युतदाब किंवा विद्युत् प्रवाह (Current) मध्ये रूपांतरित करण्यासाठी केला जातो. रूपांतर करण्याच्या या प्रक्रियेला " रेक्टिफीकेशन " असे म्हणतात.

**रेक्टिफायर्सचे वर्गीकरण (Classification):**




**1.2.1 हाफ वेव्ह रेक्टिफायर:**

या रेक्टिफायरमध्ये रेक्टिफीकेशन फक्त AC सप्लायच्या अर्ध्या सायकल चे केली जाते.

परिपथ (सर्किट) डायग्राम आणि वेव्हफॉर्म्स खालीलप्रमाणे आहेत:




**आकृती 1.21 - हाफ वेव्ह रेक्टिफायर**

1. स्टेप डाउन ट्रान्सफॉर्मरचा वापर AC मेन विद्युतदाब कमी करण्यासाठी केला जातो ज्याद्वारे रेक्टिफायर ऑपरेट करू शकतो.
2. इनपुटच्या पॉझिटिव्ह हाल्फ सायकल मध्ये डायोड फॉरवर्ड बायस्ड होतो म्हणून तो कन्डक्ट करतो आणि लोड रेझिस्टन्स $R_L$ मधून विद्युतप्रवाह जातो.
3. इनपुटच्या निगेटिव हाल्फ सायकल मध्ये डायोड रीव्हर्स बायस्ड होतो परिणामी तो कन्डक्ट करत नाही आणि $R_L$ मधून शून्य विद्युतप्रवाह जातो.
4. AC इनपुटच्या अर्ध्या चक्रातून विद्युतप्रवाह होतो म्हणून त्याला हाफ वेव्ह रेक्टिफायर म्हणतात.

**तोटे:**

1. लहरी घटक ( रिपल फॅक्टर ) जास्त आहे (१.२१).
2. कमी रेक्टिफायर कार्यक्षमता (४0%).
3. कमी TUF (२८%) म्हणजेच ट्रान्सफॉर्मरचा प्रभावीपणे वापर केला जात नाही.
4. कमी DC आउटपुट विद्युतदाब आणि विद्युत् प्रवाह (Current).

**1.2.2 फुल वेव्ह रेक्टिफायर:**

सेंटर टॅप केलेल्या ट्रान्सफॉर्मरसह फुल वेव्ह रेक्टिफायर मध्ये दोन डायोड आणि लोड रेझिस्टन्स $R_L$ असतात. सर्किट (circuit) आणि वेव्हफॉर्म आकृती 1.22 मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहेत:




**आकृती 1.22 सेंटर टॅप फुल वेव्ह रेक्टिफायर**

a) इनपुट एंडच्याधनहाफ सायकलमध्ये एंड A हा एंड B च्या संदर्भातधनआहे म्हणून P देखील Q च्या संदर्भातधनआहे. सेंटर टॅपिंगमुळे सेकेणडरी विद्युतदाब 2 ने भागला जातो म्हणजे वरच्या अर्ध्या भागात Vs/2 आणि Vs/2 खालच्या अर्ध्या भागात. वरचा Vs/2 D1 ला फॉरवर्ड बायस्ड करतो आणि खालचा Vs/2 डायोड D2 रिव्हर्स बायस्ड करतो, म्हणून विद्युत् प्रवाह (Current) फक्त वरच्या अर्ध्या भागात वाहतो आणि RL वर विद्युतदाब निर्माण करतो.

b) इनपुट एंडच्या निगेटिव्ह सायकल मध्ये एंड A हा B च्या संदर्भात निगेटिव्ह आहे, म्हणून P हा Q च्या संदर्भात निगेटिव्ह असल्यामुळे D1 रीव्हर्स बायस्ड आहे आणि D2 हा फॉरवर्ड बायस्ड आहे त्या मुळे विद्युतप्रवाह खालच्या अर्ध्या भागात RL मधून वाहतो.

**फायदे:**

1. H.W.R च्या तुलनेत कमी लहरी घटक ( रिपल फॅक्टर )
2. उत्तम रेक्टिफायर कार्यक्षमता.
3. उत्तम ट्रान्सफॉर्मर युटिलायझेशन फॅक्टर.
4. हाय अॅवरेज लोड विद्युतदाब(Load Voltage) आणि विद्युत् प्रवाह (Load Current) मूल्ये.

**तोटे:**

1. ट्रान्सफॉर्मरची किंमत जास्त आहे.
2. प्रत्येक डायोड फक्त Vs/2 रेक्टिफाय करतो म्हणून एकूण आउटपुट विद्युतदाब कमी आहे.

### 1.2.3 फुल वेव्ह ब्रिज रेक्टिफायर:

ह्या रेक्टिफायरमध्ये सेंटर टॅप केलेला ट्रान्सफॉर्मर काढून टाकला जातो आणि 2 डायोडऐवजी 4 डायोड वापरला जातो. परिपथ (सर्किट) डायग्राम आणि वेव्हफॉर्म दर्शविल्याप्रमाणे आहेत:




**आकृती 1.23 - फुल वेव्ह ब्रिज रेक्टिफायर**

a) पॉझिटिव्ह हाफ सायकल मध्ये एंड A हा पॉझिटिव्ह आहे w.r.t. B, म्हणून P पॉझिटिव्ह आहे w.r.t. Q आहे, डायोड D2 आणि D4 फॉरवर्ड बायस्ड आहेत तर D1 आणि D3 रिव्हर्स बायस्ड आहे. परिणामी विद्युत् प्रवाह P-D2-RL- D4- Q मधून वाहतो.
b) निगेटिव हाफ सायकल मध्ये A हा निगेटिव आहे w.r.t. B, म्हणून P निगेटिव w.r.t. Q आहे, ह्या मुळे D3 आणि D1 फॉरवर्ड बायस्ड आहेत आणि D4 आणि D2 रिव्हर्स बायस्ड आहेत. परिणामी विद्युत् प्रवाह Q-D3-RL- D1-P मधून वाहतो

**फायदे:**

1. कमी खर्च लागतो.
2. रेक्टिफायरची कार्यक्षमता जास्त आहे.
3. हाय अॅवरेज आउटपुट विद्युतदाब.
4. ट्रान्सफॉर्मर युटिलायझेशन फॅक्टर जास्त आहे.

**तोटे:**

1. वापरलेल्या डायोडची संख्या 2 ऐवजी 4 आहे.
2. दोन डायोड एकाच वेळी कार्य करत असल्याने, विद्युतदाब ड्रॉप वाढते आणि आउटपुट विद्युतदाब कमी होते.

**1.2.4 रेक्टिफायरचे पॅरामीटर्स**:

1. पीक इनव्हर्स विद्युतदाब (PIV):
   डायोड रीव्हर्स बायस्ड असताना त्याच्यावर असलेला सर्वात जास्त विद्युतदाबाला पीक इनव्हर्स विद्युतदाब असे म्हणतात.
2. ऍव्हरेज DC आउटपुट विद्युतदाब (Vdc): सरासरी dc विद्युतदाब जो लोड रेझीस्टर वर मिळतो त्याला ऍव्हरेज DC आउटपुट विद्युतदाब म्हणतात
3. लहरी घटक ( रिपल फॅक्टर ) (RF): ऑउटपुट विद्युतदाबाच्या ऑल्टरनेटिंग घटकांचे RMS मूल्य आणि डीसी घटकाच्या गुणोत्तर म्हणून परिभाषित केले जाते,

$$R.F = \frac{\text{ऑल्टरनेटिंग घटकांचे RMS मूल्य}}{\text{डीसी घटकाचे मूल्य}} = \frac{V_{rms}}{Vdc}$$

4. रेक्टिफायर कार्यक्षमता (η):
   DC आउटपुट पावरआणि AC इनपुट शक्तीचे गुणोत्तर. रेक्टिफायर AC ला DC मध्ये किती प्रभावीपणे रूपांतरित करतो याचे हे मोजमाप आहे.

$$\eta = \frac{\text{DC आउटपुट शक्ती}}{\text{AC इनपुट पावर}} = \frac{P_{dc}}{P_{ac}}$$

5.ट्रान्सफॉर्मर युटिलायझेशन फॅक्टर (TUF):
   ट्रान्सफॉर्मरच्या AC पावररेटिंगमध्ये लोडवर वितरित केलेल्या DC शक्तीचे गुणोत्तर.

$$T.U.F = \frac{\text{डीसी आउटपुट शक्ती}}{\text{ट्रान्सफॉर्मरचे एसी रेटिंग}}$$

**1.2.5 रेक्टिफायर्सची तुलना:**

| | Rectifier Parameters | Half-wave Rectifier | Full-wave Rectifier | |
|---|---|---|---|---|
| | | | Centre-tap | Bridge |
| 1. | Number of diodes | 1 | 2 | 4 |
| 2. | Transformer necessity | No | Yes | No |
| 3. | Peak secondary voltage, $V_s$ | $V_m$ | $V_m$ | $V_m$ |
| 4. | Peak Inverse voltage | $V_m$ | $2\ V_m$ | $V_m$ |
| 5. | Peak load current, $I_m$ | $\frac{V_m}{(R_f + R_L)}$ | $\frac{V_m}{(R_f + R_L)}$ | $\frac{V_m}{(2R_f + R_L)}$ |
| 6. | RMS load current, $I_{rms}$ | $\frac{I_m}{2} = 0.5\ I_m$ | $\frac{I_m}{\sqrt{2}} = 0.707\ I_m$ | $\frac{I_m}{\sqrt{2}} = 0.707\ I_m$ |
| 7. | DC (average) current, $I_{dc}$ | $\frac{I_m}{\pi} = 0.318\ I_m$ | $\frac{2\ I_m}{\pi} = 0.636\ I_m$ | $\frac{2\ I_m}{\pi} = 0.636\ I_m$ |
| 8. | Ripple factor , r | 1.21 | 0.482 | 0.482 |
| 9. | Form factor, F | 1.57 | 1.11 | 1.11 |
| 10. | Maximum rectification efficiency, $\eta_{max}$ | 40.6% | 81.2% | 81.2% |
| 11. | Transformer utilization factor (TUF) | 0.287 | 0.693 | 0.812 |
| 12. | Ripple frequency, $f_r$ | $f_i$ | $2\ f_i$ | $2f_i$ |

**1.3 फिल्टरचे प्रकार:**

**फिल्टर:**

फिल्टर हे प्युअर रिपल फ्री DC विद्युतदाब मिळविण्यासाठी रेक्टिफायर्ससह वापरले जाणारे इलेक्ट्रॉनिक परिपथ (सर्किट) आहेत. रेक्टिफायर्स आउटपुटवर पल्सेटिंग डीसी तयार करतात आणि प्युअर DC मिळविण्यासाठी ते रेक्टिफायरच्या आउटपुटला जोडलेले असते.




(a) Pulsating dc at rectifier output (b) Ideal pure dc voltage (c) Rectifier to filter connection

**आकृती 1.24 a - फिल्टरचे कार्य**

**फिल्टर चे प्रकार:**

वापरलेल्या घटकाच्या आधारे आणि कॉन्फिगरेशनवर अवलंबून फिल्टरचे वर्गीकरण केले जाते.




**आकृती 1.24 b फिल्टरचे वर्गीकरण**

**1.3.1 इंडक्टर फिल्टर:**

इंडक्टर फिल्टर RL च्या सीरीझ मध्येजोडलेले आहे. इंडक्टरचा गुणधर्म असा आहे की तो त्याच्याद्वारे विद्युतप्रवाहातील कोणत्याही बदलांना विरोध करतो. इंडक्टर AC ला विरोध करतो आणि DC परवानगी देतो आणि रेक्टिफायरच्या आउटपुटमध्ये विद्युत् प्रवाह रिपल्स कमी करण्यासाठी वापरला जातो.




**आकृती 1.25 - इंडक्टर फिल्टर**

**फायदे:**

1. जास्त विद्युत् प्रवाह वर कमी लहरी घटक ( low ripple factor ) .
2. आउटपुटमधील रिपल्स कमी करते.

**तोटे:**

1. हे सर्किट अवझड आणि महाग आहे.
2. नको तो आवाज(Noise) निर्माण होतो.
3. कमी लोडवर रिपेल फॅकटर कमी असतो.

**1.3.2 कॅपेसिटर फिल्टर:**

कॅपेसिटर फिल्टर $R_L$ ला (समांतर) जोडलेले आहे. रिपल्स यशस्वीरित्या कमी करण्यासाठी C चे मुल्य खूप मोठे आहे. सामान्यतः इलेक्ट्रोलाइटिक कॅपेसिटर वापरले जातात. कॅपेसिटर DC ला विरोध करतो आणि AC ला जाण्याची परवानगी देतो.




**(a) Connection of filter capacitor** **(b) FWR with capacitor input filter**

**आकृती 1.26 - कॅपेसिटर फिल्टर**




**आकृती 1.27 - कॅपेसिटर फिल्टर वावेफॉर्म**

**फायदे:**

1. डिझाइन करणे सोपे.
2. रिपेल फॅक्टर मध्ये घट.
3. ऍव्हरेज आउटपुट विद्युतदाबमध्ये वाढ.
4. लहान आकार, कमी खर्च.

**तोटे:**

1. रिपेल फॅक्टर लोडवर अवलंबून असतो.
2. डायोड पीक विद्युत् प्रवाह हाताळू शकतात.

### 1.3.3 चोक इनपुट किंवा LC फिल्टर:

$R_L$च्या कमी मूल्यांसाठी इंडक्टर फिल्टरला प्राधान्य दिले जाते आणि $R_L$च्या उच्च मूल्यांसाठी कॅपेसिटर फिल्टरला प्राधान्य दिले जाते. इंडक्टर फिल्टरमध्ये लोड रेझिस्टन्स जसजसा वाढतो तसतसे रिपल्स वाढते आणि सी फिल्टरमध्ये $R_L$ वाढल्याने ते कमी होते म्हणून या दोन फिल्टर्सच्या मिश्रणाचा परिणाम $L_C$ फिल्टरमध्ये होतो जो लोडचा विचार न करता कमी लहरी घटक ( रिपल फॅक्टर ) देतो.




**आकृती 1.28 - चोक इनपुट किंवा LC फिल्टर**

ब्लीडर रेझिस्टन्सचा वापर L द्वारे सतत विद्युत् प्रवाह चालू ठेवण्यासाठी केला जातो. ते कॅपेसिटरला डिस्चार्ज करण्यासाठी मार्ग देखील प्रदान करते. सीरिज इंडक्टर आउटपुट मधील रिपल्सवर उच्च प्रतिक्रिया देतो आणि त्यांना कमी करतो आणि समांतर कॅपेसिटर त्यांच्यासाठी कमी प्रतिक्रिया पथ प्रदान करतो.

**फायदे:**

1. चांगले भार नियमन (रेग्लूलेशन).
2. लहरी घटक ( रिपल फॅक्टर ) कमी आहे आणि लोडवर अवलंबून नाही.
3. हलक्या आणि जड भारांसाठी योग्य.
4. डायोड तीव्र गती(surge) विद्युत् प्रवाह वाहून नेत नाहीत.

**तोटे:**

1. इंडक्टरमध्ये आवाज (Noise) निर्माण होतो.
2. L आणि C घटकांच्या मोठ्या मूल्यामुळे परिपथ (सर्किट) महाग होते.
3. DC प्रतिकारामुळे L मध्ये शक्तीची हानी होते.

**1.3.4 सिएलसी किंवा π फिल्टर**:

π प्रकार फिल्टर हे कॅपेसिटर फिल्टर आणि LC फिल्टरचे संयोजन आहे. यात इंडक्टर L सह दोन कॅपेसिटर C1 आणि C2 असतात.




**आकृती 1.29 - सिएलसी किंवा π फिल्टर**

**फायदे:**

1. लहरी घटक ( रिपल फॅक्टर ) कमी आहे आणि लोडवर अवलंबून नाही.
2. कमी व जास्त विद्युत् भारांसाठी योग्य.
3. डायोड तीव्र गती (Surge) विद्युत् प्रवाह वाहून नेत नाहीत.

**तोटे:**

1. इंडक्टन्सच्या वापरामुळे सर्किटचे वजन वाढते.
2. जास्त घटकांच्या वापरामुळे सर्किट महाग होते.
3. उच्च पीक डायोड विद्युत् प्रवाह.

**1.4 रेक्टिफायर IC – KBU 808 IC पिन डायग्राम आणि अनूप्रयोग**

ब्रिज रेक्टिफायर हा एक प्रकारचा रेक्टिफायर परिपथ (सर्किट) आहे जो AC इनपुटला DC आउटपुटमध्ये रूपांतरित करण्यासाठी ब्रिज कॉन्फिगरेशनमध्ये चार डायोड वापरतो.

**1.4.1 ब्रिज रेक्टिफायर IC चे पिन डायग्राम**

1) इनपुट पिन (AC-1):
   AC इनपुटच्या टर्मिनलला जोडते.
2) इनपुट पिन (AC-2):
   AC इनपुटच्या इतर टर्मिनलला जोडते.




**आकृती 1.30 - KBU 808**

3) पॉझिटिव्ह DC आउटपुट पिन (DC+):
   पॉझिटिव्ह DC आउटपुटचे पॉसिटीव टर्मिनल प्रदान करते.
4) निगेटिव्ह DC आउटपुट पिन (DC-):
   सुधारित डीसी आउटपुटचे निगेटिव्ह टर्मिनल प्रदान करते.

**अनुप्रयोग:**

1) पावरसप्लाय: इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये इलेक्ट्रोनिक डीवायसस ना उर्जा देण्यासाठी मईन्स ते DC विद्युत् प्रवाह (Current)मध्ये रूपांतरित करण्यासाठी वापरला जातो.
2) बॅटरी चार्जर: इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये बॅटरी चार्ज करण्यासाठी वॉल आउटलेटमधून AC इनपुट दुरुस्त करण्यासाठी वापरले जाते.
3) एलईडी ड्रायव्हर्स: स्थिर DC विद्युतदाब प्रदान करण्यासाठी एलईडी लाइटिंग सिस्टममध्ये वापरले जाते

**सोडवलेली उदाहरणे:**

**1) 230 V चा AC पुरवठा हाल्फ वेव रेकटीफायर ला वळणाचे गुणोत्तर 10:1 असलेल्या ट्रान्सफॉर्मरद्वारे लागू केला जातो. सरासरी डीसी आउटपुट, विद्युतदाब विदूत (विद्युत् प्रवाह (Current)) आणि डायोडचे पीआयव्ही, विद्युतदाबचे आरएमएस मूल्य आणि प्रवाह शोधा.**

**उत्तर:** Vrms = 230V,

np/ns=10/1

कमाल प्राथमिक विद्युतदाब Vp=√2 x Vrms =√2 x 230 = 325.22Volt आहे

कमाल दुय्यम विद्युतदाब Vm=ns/np x Vp =1/10x325.22 =32.52V

वी ॲवरेज =Vdc=Vm/Π =32.5/ 3.14 =10.35V आहे

PIV=Vm= 32.52V

Vrms=Vm/2 =32.52/2 =16.25V

Idc=Im/ π , Irms= Im/2

RL=10KΩ गृहीत धरा

Im=Vm/RL=32.52/10x1000 =3.25mA

Idc=Im/π =3.25x$10^{-3}$/π =1.03 mA

Irms=Im/2 =3.25x$10^{-3}$/2=1.62 mA

**2) 10:1 च्या वळण गुणोत्तराच्या ट्रान्सफॉर्मरद्वारे अर्ध-वेव्ह रेक्टिफायर परिपथ (सर्किट)ला 230 V चा A.C पुरवठा लागू केला जातो. (i) आउटपुट D.C. विद्युतदाब आणि (ii) शिखर व्यस्त विद्युतदाब शोधा. डायोड आदर्श गृहीत धरा.**




प्राथमिक ते दुय्यम वळण आहे:

$$\frac{N_1}{N_2} = 10$$

R.M.S primary voltage = 230V

$$\therefore \text{Max. Primary voltage is } V_{pm} = \sqrt{2} \times \text{R.M.S primary voltage}$$
$$= \sqrt{2} \times 230 = 325.3V$$

Max. Secondary voltage is

$$V_{sm} = V_{pm} \text{ x } \frac{N_2}{N_1} = 325.3 \text{ x } \frac{1}{10} = 32.53V$$

$$I_{DC} = \frac{I_m}{\pi}$$

$$V_{DC} = \frac{I_m}{\pi} \times R_L = \frac{V_{sm}}{\pi} = \frac{32.53}{\pi} = 10.36V$$

A.C पुरवठ्याच्या नकारात्मक अर्ध-चक्र दरम्यान, डायोड उलट पक्षपाती असतो आणि त्यामुळे विद्युत् प्रवाह (Current) चालवत नाही. म्हणून, डायोडमध्ये कमाल दुय्यम विद्युतदाब दिसून येते.

∴पीक व्यस्त विद्युतदाब = 32.53 V

**स्वाध्याय:**

1. PN जंक्शन डायोडचे दोन अनुप्रयोग लिहा.
2. PN जंक्शन डायोडची VI कॅरेक्टरीस्टीक्स (Characteristics) काढा आणि ती समजावुन सांगणे.
3. फोटोडायोडचे चिन्ह काढा.
4. झीनर डायोडची रिव्हर्स बायस्ड V-I कॅरेक्टरीस्टीक्स (Characteristics) काढा आणि वर्णन करा.
5. LED च्या कार्याचे वर्णन करा.
6. रेक्टिफायर्सशी संबंधित खालील टर्म्स परिभाषित करा:
   - ii) रिपेल फॅटर .
   - iii) रेक्टिफायरची कार्यक्षमता.
   - iv) ट्रान्सफॉर्मर वापर फॅटर (Utilization Factor).
   - v) पीक इनव्हर्स विद्युतदाब PIV.
7. फिल्टरची गरज सांगा. π फिल्टरचे परिपथ (सर्किट) डायग्राम काढा आणि ते कार्य कसे करते हे सांगा.
8. खालील मुद्द्यांवर PN जंक्शन डायोड आणि झीनर डायोड यांच्यात तुलना करा:
   - v) चिन्ह.
   - vi) विद्युत् प्रवाह (Current) ची दिशा (डायरेक्शन ऑफ विद्युतप्रवाह).
   - vii) रिव्हर्स ब्रेकडाउन.
   - viii) अनुपयोग .
9. फुल वेव्ह ब्रिज रेक्टिफायरमध्ये Vm = 10V, RL = 10K Ω. VDC, IDC, लहरी घटक ( रिपल फॅक्टर ) आणि PIV गणना कर.

**संदर्भ (Reference):**


| Sr.No | Author | Title | Publisher with ISBN Number |
|---|---|---|---|
| 1 | V .K. Mehta ,Rohit Mehta | Principles of Electronics | S.Chand and Company Ram Nagar, New Delhi-110 055,11th edition 2014, ISBN 9788121924504 |
| 2 | R.S.Sedha | A textbook of Applied Electronics | S Chand, New Delhi 2008, ISBN:978-8121927833 |
| 3 | Theraja B.L. (Author), Sedha R.S. (Author) | Principles of Electronic Devices and Circuits (Analog and Digital) | S Chand & Company,ISBN-13 978-8121921992 |

## युनिट - 2

## बायपोलर जंक्शन ट्रांझिस्टर
## (Bipolar Junction Transistor)

**विषय निष्पत्ती (Course Outcome):**
अणुविद्युत सर्किटमध्ये बायपोलर जंक्शन ट्रांझिस्टर वापरणे.
Use BJT in electronics circuits .

**युनिट निष्पत्ती (Unit Outcome):**
2.a दिलेल्या प्रकारच्या ट्रांझिस्टरच्या कार्याचे वर्णन करणे.
Describe the working principle of the given type of transistor.
2.b दिलेल्या BJT कॉन्फिगरेशनसाठी विद्युत दाब गेनची गणना करणे.
Calculate Current gain for given configuration of BJT
2.c ट्रांझिस्टर कॉन्फिगरेशनची तुलना करणे.
Compare configuration of transistors.
2.d बायसिंग पद्धतीच्या गरजेचे स्पष्टिकरण करा.
Justify the need of biasing method.
2.e ट्रांझिस्टर मधील थर्मल रनअवे प्रभाव कमी करण्याच्या प्रक्रियेचे वर्णन करा
Describe the procedure to minimize the thermal runaway effect.

**परिचय:**
बायपोलर जंक्शन ट्रांझिस्टर 1951 मध्ये बेल लॅबोरेटरीज टीमसह डॉ. शॉकले यांनी विकसित केले होते. ऑक्टोबर 1952 मध्ये, जेव्हा बेल सिस्टीमने टेलिफोन स्विचिंग सर्किट्समध्ये ट्रांझिस्टर सर्किट्सचा वापर केला तेव्हा पहिल्यांदा हा घटक व्यावसायिक उपक्रमात वापरला गेला. तेव्हापासून इलेक्ट्रॉनिक्सच्या क्षेत्रात क्रांती झाली आहे.
BJT हा सर्व आधुनिक इलेक्ट्रॉनिक प्रणालींचा मुख्य बिल्डिंग ब्लॉक आहे. हे तीन-टर्मिनल घटक आहे ज्याचे आउटपुट विद्युत प्रवाह (Current), विद्युत दाब(voltage) किंवा शक्ती(power) त्याच्या इनपुट विद्युत प्रवाहद्वारे नियंत्रित केले जातात. कम्युनिकेशन सिस्टीममध्ये, हे ॲम्प्लिफायरमधील प्राथमिक घटक म्हणून वापरले जाते. ॲम्प्लीफायर हे एक सर्किट आहे जे AC सिग्नलची ताकद वाढवण्यासाठी द्विधृवीय ट्रांझिस्टर वापरतात. डिजिटल कॉम्प्युटर इलेक्ट्रॉनिक्समध्ये, BJT हा हाय-स्पीड इलेक्ट्रॉनिक स्विच म्हणून वापरला जातो जो दोन ऑपरेटिंग स्टेट (खुल्या आणि बंद) मध्ये प्रति सेकंद कित्येक अब्ज वेळा स्विच करण्यास सक्षम आहे.द्विध्रुवीय जंक्शन ट्रांझिस्टर अधिक सामान्यतः जंक्शन ट्रांझिस्टर, द्विधृवीय ट्रांझिस्टर म्हणून ओळखला जातो.
द्विध्रुवीय जंक्शन ट्रांझिस्टरमध्ये एक अतिशय महत्त्वाचा गुणधर्म असतो जो सिग्नलची ताकद वाढवू शकतो. या गुणधर्माला प्रवर्धन म्हणतात. या गुणधर्मामुळे, ट्रांझिस्टर सर्वात मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या सेमीकंडक्टर उपकरणांपैकी एक आहे. सध्या, ट्रांझिस्टर डिजिटल संगणक, उपग्रह मोबाइल फोन आणि इतर संपर्क प्रणाली, नियंत्रण प्रणाली इत्यादींमध्ये वापरले जातात.

**2.1 विद्युत् प्रवाह (Current) प्रवाह - ऑपरेटेड उपकरण (Current Operated Device):**
डिव्हाइसला विद्युत् प्रवाह (Current) - ऑपरेटेड डिव्हाइस म्हटले जाते जेव्हा ते चालू आणि बंद करणे त्यातून वाहणाऱ्या विद्युत् प्रवाह (Current) वर अवलंबून असते .
विद्युत् प्रवाह (Current) ऑपरेटिंग डिव्हाईसेस: उदा.. BJT, SCR, TRIAC, GTO, इ.
ट्रांझिस्टरच्या कलेक्टर मधून वाहणाऱ्या विद्युत् प्रवाहाला बेस टर्मिनलमधून वाहणाऱ्या विद्युत प्रवाहाद्वारे कंट्रोल केला जातो.

**2.2 बायपोलर जंक्शन ट्रांझिस्टर (Bipolar Junction Transistor)-**
बायपोलर: हा दोन्ही प्रकारच्या चार्ज कॅरीयर इलेक्ट्रॉन (Electron) आणि होल्स (Hole) मुळे वाहतो.
जंक्शन: दोन P-N जंक्शन आहेत.
ट्रांझिस्टर: ट्रान्सफर + रेझिस्टर.

ट्रांझिस्टरमध्ये दोन PN जंक्शन असतात. जे P-टाइप किंवा N-टाइप सेमीकंडक्टर विरुद्ध प्रकारांच्या सेमीकंडक्टर जोडी दरम्यान सँडविचिंग करून जंक्शन तयार होतात.

त्यानुसार; ट्रांझिस्टरचे दोन प्रकार आहेत, म्हणजे;

(ii) N-P-N ट्रांझिस्टर

(iii) P-N-P ट्रांझिस्टर




i) N-P-N ट्रांझिस्टर (ii) P-N-P ट्रांझिस्टर

**आकृती 2.1 ट्रांझिस्टर प्रतीक (Transistor Symbol)**

**बायपोलर जंक्शन ट्रांझिस्टरचे कंस्ट्रक्शन (Construction):**

आकृती. 2.1 मध्ये दाखविल्याप्रमाणे ट्रांझिस्टर हे तीन-लेयर सेमीकंडक्टर उपकरण आहे .ज्यामध्ये एक प्रकारचा सेमीकंडक्टर (एकतर P-टाइप किंवा N-टाइप) दोन अन्य समान प्रकारच्या सेमीकंडक्टरमध्ये सँडविच केला जातो.

बायपोलर जंक्शन ट्रांझिस्टर सेमीकंडक्टर मटेरियलच्या तीन लेअरनी तयार होतो, जर तो P-N-P ट्रांझिस्टर असेल, तर त्याला दोन P-प्रकारचे रिजन आणि एक N-प्रकारचे रिजन असतील, त्याचप्रमाणे, जर ते N-P-N ट्रांझिस्टर असेल तर त्यात दोन N- रिजन आणि एक P-प्रकार रिजन असतील.

ट्रांझिस्टरमध्ये एमिटर, कलेक्टर आणि बेस असे तीन टर्मिनल असतात. त्यांचे कार्य खालील प्रमाणे आहे:

**एमिटर** - ट्रांझिस्टरमध्ये, एमिटर बहुसंख्य मेजॉरिटी चार्ज कॅरींयरचा पुरवठा करतो. एमिटर नेहमी बेसच्या संदर्भात फॉरवर्ड बायस्ड (Biased) केला जातो, जेणेकरून ते बेसला बहुसंख्य चार्ज कॅरींयर पुरवते. ट्रांझिस्टरचा एमिटर जास्त डोपिंग केलेला आणि आकाराने मध्यम असतो.

**कलेक्टर** - ट्रांझिस्टरमध्ये, जो विभाग एमिटरद्वारे पुरवलेल्या चार्ज कॅरियरचा बहुसंख्य भाग गोळा करतो त्याला कलेक्टर म्हणतात. कलेक्टर-बेस जंक्शन नेहमी रिव्हर्स बायस असतो. ट्रांझिस्टरचा कलेक्टर विभाग माफक (Moderate) प्रमाणात डोपिंग केलेला आहे, परंतु आकाराने मोठा आहे जेणेकरून ते एमिटरद्वारे पुरवलेले बहुतेक चार्ज कॅरियर गोळा करू शकेल.

**बेस** - ट्रांझिस्टरचा मधला भाग बेस म्हणून ओळखला जातो. बेस दोन सर्किट्स बनवतो, एमिटरसह इनपुट सर्किट(Circuit) आणि कलेक्टरसह आउटपुट सर्किट(Circuit). एमिटर-बेस फॉरवर्ड-बायस्ड आहे आणि सर्किटला (Circuit) लो रेझिस्टन्स देते. कलेक्टर-बेस जंक्शन रिव्हर्स बायसमध्ये आहे आणि सर्किटला हाय रेझिस्टन्स देते. ट्रांझिस्टरचा बेस हलके डोप (Lightly Doped) केलेला आणि खूप थिन (Thin)असतो ज्यामुळे तो बेसला बहुसंख्य चार्ज कॅरियर देण्याची तयारी दर्शवतो.

**ट्रांझिस्टरचे कार्य तत्त्व (Transistor working principle):**

**एनपीएन (N-P-N) ट्रांझिस्टरचे काम:**




**आकृती 2.2 N-P-N ट्रांझिस्टर**

आकृती. 2.2 मध्ये दाखविल्याप्रमाणे N-P-N ट्रांझिस्टरला एमिटर बेस जंक्शन फॉरवर्ड बायस आणि कलेक्टर-बेस जंक्शन रिव्हर्स बायस असते. फॉरवर्ड बायसमुळे, N-टाईप एमिटर मधील इलेक्ट्रॉन्स बेसकडे वाहतो. यामुळे विद्युत् प्रवाह (Current) $I_E$ तयार होतो. हे इलेक्ट्रॉन P-टाइप बेसमधून वाहतात म्हणून, ते होल्स बरोबर एकत्र होतात. बेस हलके डोप (lightly doped) केलेला आणि खूप थिन (Thin) असल्यामुळे, फक्त काही इलेक्ट्रॉन (5% पेक्षा कमी) होल्ससोबत एकत्रित होऊन बेस विद्युत् प्रवाह (Current) $I_B$ तयार होतो.

उर्वरित (95% पेक्षा जास्त) कलेक्टर क्षेत्रामध्ये ओलांडून कलेक्टर विद्युत् प्रवाह (Current) Ic तयार करतात.

अशा प्रकारे, कलेक्टर सर्किटमध्ये जवळजवळ संपूर्ण एमिटर विद्युत् प्रवाह (Current) वाहतो. हा एमिटर विद्युत् प्रवाह (Current) कलेक्टर आणि बेस करंट्सची बेरीज असते.

$I_E = I_B + I_C$

**पीएनपी (P-N-P )ट्रांझिस्टरचे काम:**




**आकृती 2.3 पीएनपी ट्रांझिस्टर**

आकृती 2.3 P-N-P ट्रांझिस्टरचे मूलभूत कनेक्शन दर्शविते. फॉरवर्ड बायसमुळे P-टाइप एमिटरमधील होल्स बेसकडे वाहतात याला एमिटर विद्युत् प्रवाह (Current) $I_E$ असे म्हणत्तात. हे होल्स N-टाइप बेसमध्ये जात असताना, ते इलेक्ट्रॉन्ससह एकत्रित होतात. बेस हलके डोप(Lightly Doped) केलेला आणि खूप बारीक(thin) असल्यामुळे, फक्त काही इलेक्ट्रॉन (5% पेक्षा कमी) होल्ससोबत एकत्रित होऊन बेस विद्युत् प्रवाह (Current) $I_B$ तयार होतो. उर्वरित (95% पेक्षा जास्त) कलेक्टर क्षेत्रामध्ये ओलांडून कलेक्टर विद्युत् प्रवाह (Current) Ic तयार करतात. अशा प्रकारे, जवळजवळ संपूर्ण एमिटर विद्युत् प्रवाह (Current) कलेक्टरमध्ये वाहतो

P-N-P ट्रांझिस्टरमध्ये हे लक्षात घेतले जाऊ शकते की विद्युत् प्रवाह (Current) कंडकशन हे होल्स मुळे होते तथापि, बाह्य कनेक्टिंग तारांमध्ये विद्युत् प्रवाह (Current) अजूनही इलेक्ट्रॉन्सद्वारे आहे. इनपुट परिपथ (सर्किट) (म्हणजे एमिटर-बेस जंक्शन) आहे. फॉरवर्ड बायसमुळे लो रेसिस्टन्स तर आउटपुट परिपथ (सर्किट) (म्हणजे कलेक्टर-बेस जंक्शन) मध्ये रिव्हर्स बायसमुळे हाय रेसिस्टन्स असतो. इनपुट एमिटर विद्युत् प्रवाह (Current) जवळजवळ संपूर्णपणे कलेक्टर परिपथ (सर्किट)मध्ये वाहतो. म्हणून, ट्रांझिस्टर इनपुट सिग्नल ट्रान्सफर करतो .लो रेसिस्टन्स परिपथ (सर्किट)पासून हाय रेसिस्टन्स परिपथ (सर्किट)पर्यंत. ट्रांझिस्टरच्या अॅप्लिफिकेशनसाठी हे मुख्य घटक जबाबदार आहेत.

**2.3 ट्रांझिस्टर कॉन्फिगरेशन**

ट्रांझिस्टर जर दोन पोर्ट नेटकाम उपकरण म्हणून वापरायचा असेल तर त्यासाठी चार टर्मिनल ची आवश्यकता आहे.पण ट्रांझिस्टर ला ३ टर्मिनल असतात. त्यामुळे जर आपल्याला ट्रांझिस्टर टू पोर्ट नेटकाम नुसार वापरायचा असेल तर ट्रांझिस्टरच्या तीन टर्मिनल्स पैकी एक टर्मिनल हा इनपुट आणि आऊटपुट पोर्ट मध्ये कॉमन टर्मिनल म्हणून वापरू शकतो. त्यानुसार ट्रांझिस्टर खालील तीन कॉन्फिगरेशन मध्ये वापरता येतो

1. कॉमन बेस संरचना (कॉन्फिगरेशन)
2. कॉमन एमीटर संरचना (कॉन्फिगरेशन)
3. कॉमन कलेक्टर संरचना (कॉन्फिगरेशन)

**1.कॉमन बेस्(CB) संरचना (कॉन्फिगरेशन)**




**आकृती 2.4 कॉमन बेस्(CB) कॉन्फिगरेशन (N-P-N)**




**आकृती 2.5 कॉमन बेस्(CB) कॉन्फिगरेशन(P-N-P)**

आकृती 2.4 मध्ये एन पी एन (N-P-N) ट्रांझिस्टर साठी कॉमन बेस् (CB) कॉन्फिगरेशन दाखवले आहे. आकृती 2.5 मध्ये पी एन पी (P-N-P) ट्रांझिस्टर साठी कॉमन बेस(CB) कॉन्फिगरेशन दाखवले आहे. CB कॉन्फिगरेशन मध्ये विद्युतदाब हे इमिटर आणि बेस मध्ये अप्लाय केले आहे. बेस हा इनपुट आणि आउटपुट पोर्ट मधील कॉमन टर्मिनल आहे. इथे इनपुट विद्युतदाब हे $V_{EB}$ असून इनपुट विद्युत् प्रवाह (Current) $I_E$ आहे .कलेक्टर आणि बेस मध्ये आउटपुट घेतले जाते. त्यामुळे $V_{CB}$ हे आउटपुट विद्युतदाब असून $I_C$ हा आउटपुट विद्युत् प्रवाह (Current) आहे.

**2. कॉमन इमिटर(CE) संरचना (कॉन्फिगरेशन)**




**आकृती 2.6 कॉमन इमिटर(CE) कॉन्फिगरेशन(N-P-N)**




**आकृती 2.7 कॉमन इमिटर(CE) कॉन्फिगरेशन(P-N-P)**

आकृती 2.6 मध्ये एन पी एन( N-P-N) ट्रांझिस्टर साठी कॉमन इमिटर(CE) कॉन्फिगरेशन दाखवले आहे

आकृती 2.7 मध्ये पी एन पी (P-N-P) ट्रांझिस्टर साठी कॉमन इमिटर(CE) कॉन्फिगरेशन दाखवले आहे CE कॉन्फिगरेशन मध्ये विद्युतदाब हे इमिटर आणि बेस मध्ये दिलेले आहे. इमिटर हा इनपुट आणि आउटपुट पोर्ट मधील कॉमन टर्मिनल आहे. इथे इनपुट विद्युतदाब हे $V_{BE}$ असून इनपुट विद्युत् प्रवाह (Current) $I_B$ आहे . कलेक्टर आणि इमिटर मध्ये आउटपुट घेतले जाते. त्यामुळे $V_{CE}$ हे आउटपुट विद्युतदाब असून $I_C$ हा आउटपुट विद्युत् प्रवाह (Current) आहे.

**3.कॉमन कलेक्टर (CC) संरचना (कॉन्फिगरेशन)**




**आकृती 2.8 कॉमन कलेक्टर (CC) कॉन्फिगरेशन(NPN)**




**आकृती 2.9 कॉमन कलेक्टर (CC) कॉन्फिगरेशन(P-N-P)**

आकृती 2.8 मध्ये एन पी एन(N-P-N) ट्रांझिस्टर साठी कॉमन कलेक्टर (CC) कॉन्फिगरेशन दाखवले आहे.

आकृती 2.9 मध्ये पी एन पी (PNP) ट्रांझिस्टर साठी कॉमन कलेक्टर (CC) कॉन्फिगरेशन दाखवले आहे.

CC कॉन्फिगरेशन मध्ये इनपुट विद्युतदाब हे कलेक्टर आणि बेस टर्मिनल मध्ये दिले आहे. कलेक्टर हा इनपुट आणि आउटपुट पोर्ट मधील कॉमन टर्मिनल आहे. इथे इनपुट विद्युतदाब हे $V_{BC}$ असून इनपुट विद्युत् प्रवाह (Current) $I_B$ आहे. कलेक्टर आणि इमिटर मध्ये आउटपुट घेतले जाते. त्यामुळे $V_{EC}$ हे आउटपुट विद्युतदाब असून $I_E$ हा आउटपुट विद्युत् प्रवाह (Current) आहे.

**CE कॉन्फिगरेशन इनपुट वैशिष्टये (Characteristics)-**




Input characteristics of the transistor in CE configuration

**आकृती 2.10 CE कॉन्फिगरेशन इनपुट वैशिष्टये (Characteristics)**

आकृती 2.10 मध्ये CE कॉन्फिगरेशन साठी इनपुट वैशिष्टये (characteristics) दाखवले आहे CE कॉन्फिगरेशन चे इनपुट वैशिष्टये (characteristics) ही इनपुट विद्युत् प्रवाह (Current) $I_B$ आणि इनपुट विद्युतदाब $V_{BE}$ यामधील संबंध दाखवते त्यावेळी आऊटपुट विद्युतदाब $V_{CE}$ हा पॅरामीटर कॉन्स्टंट ठेवलेला असतो. इथे इनपुट विद्युत् प्रवाह (Current) हा बेस विद्युत् प्रवाह (Current) $I_B$ असून इनपुट विद्युतदाब $V_{BE}$ हा बेस इमिटर विद्युतदाब आहे तर $V_{CE}$ हा कलेक्टर इमिटर आउटपुट विद्युतदाब आहे. आकृती 2.10 आलेख मध्ये दाखवल्यानुसार जर आपण $V_{BE}$ ची व्हॅल्यू कॉन्स्टंट ठेवली आणि $V_{CE}$ ची व्हॅल्यू वाढवत गेलो तर बेस् विद्युत् प्रवाह (Current) $I_B$ कमी होतो.

**CE कॉन्फिगरेशन आउटपुट पुट वैशिष्ट्ये (Characteristics)**




Output characteristics of the transistor in CE configuration

**आकृती 2.11 CE कॉन्फिगरेशन आउटपुट पुट वैशिष्ट्ये (Characteristics)**

आकृती 2.11 मध्ये दाखविल्याप्रमाणे आउटपुट वैशिष्ट्ये (Characteristics) ही आऊटपुट विद्युत् प्रवाह (Current) $I_C$ आणि आऊटपुट विद्युतदाब $V_{CE}$ यामधील संबंध दाखवते. हा ग्राफ वेगळ्या $I_B$ च्या व्हॅल्यू साठी काढला आहे आलेखमध्ये दाखवल्यानुसार कार्याचे चे तीन रीजनस आहेत ,कट ऑफ, ऍक्टिव्ह आणि सचुरेशन रीजन. कट ऑफ रीजनमध्ये ट्रांझिस्टर हा ओपन स्विच म्हणून काम करतो. सचुरेशन रीजन मध्ये ट्रांझिस्टर क्लोज स्विच म्हणून काम करतो. ऍक्टिव्ह रीजनमध्ये ट्रांझिस्टर ऍम्प्लिफायर म्हणून काम करतो.

**इनपुट वैशिष्ट्ये (Characteristics) ऑफ CB कॉन्फिगरेशन-**




CB input characteristics

**आकृती 2.12 CB कॉन्फिगरेशन इनपुट वैशिष्ट्ये (Characteristics)**

आकृती 2.12 मधील आलेख मध्ये दाखवल्यानुसार CB कॉन्फिगरेशन ची इनपुट वैशिष्ट्ये (Characteristics) ही इनपुट विद्युत् प्रवाह (Current) $I_E$ आणि इनपुट विद्युतदाब $V_{BE}$ यामधील संबंध दाखवते. आलेख मध्ये दाखवल्यानुसार इनपुट वैशिष्ट्ये (Characteristics) ही कॉन्स्टंट आउटपुट विद्युतदाब $V_{CB}$ च्या खाली काढली आहे.

इनपुट वैशिष्ट्ये ही P-N जंक्शन डायोड च्या फॉरवर्ड वैशिष्ट्ये (Characteristics) सारखी आहे. कट इन विद्युतदाबपर्यंत इमिटर विद्युत् प्रवाह (Current) हा निगलिजिबल (Negligible) असून, त्यानंतर तो स्मॉल $V_{BE}$ च्या वाढल्यामुळे तीव्र वाढतो

**आउटपुट वैशिष्टये (characteristics) ऑफ CB कॉन्फिगरेशन-**




**आकृती 2.13 आउटपुट वैशिष्टये (Characteristics) CB कॉन्फिगरेशन**

आकृती 2.13 मधील आलेखमध्ये दाखवल्यानुसार $C_B$ कॉन्फिगरेशन ची आऊटपुट वैशिष्टये (Characteristics) ही आऊटपुट विद्युत् प्रवाह (Current) $I_C$ आणि आऊटपुट विद्युतदाब $V_{CB}$ यामधील संबंध दाखवते आलेख मध्ये दाखवल्यानुसार आऊटपुट वैशिष्टये (Characteristics) ही कॉन्स्टंट इनपुट विद्युत् प्रवाह (Current) $I_E$ च्या खाली काढली केली आहे.

**इनपुट वैशिष्टये (characteristics) ऑफ CC कॉन्फिगरेशन-**




**आकृती 2.14 CC कॉन्फिगरेशन चे इनपुट वैशिष्टये (Characteristics)**

आकृती 2.14 मधील ग्राफ मध्ये दाखवल्यानुसार CC कॉन्फिगरेशन ची इनपुट वैशिष्टये (Characteristics) ही इनपुट विद्युत् प्रवाह (Current) $I_B$ आणि इनपुट विद्युतदाब $V_{BC}$ यामधील रिलेशन दाखवते. ग्राफ मध्ये दाखवल्यानुसार इनपुट वैशिष्टये (Characteristics) ही कॉन्स्टंट आऊटपुट विद्युतदाब $V_{CE}$ च्या खाली काढली केली आहे.

**आउटपुट वैशिष्टये (characteristics) ऑफ CC कॉन्फिगरेशन-**




**आकृती 2.15 CC कॉन्फिगरे शनचे आउटपुट वैशिष्टये (Characteristics)**

आकृती 2.15 मधील आलेख मध्ये दाखवल्यानुसार CC कॉन्फिगरेशन ची आऊटपुट वैशिष्टये (Characteristics) ही आऊटपुट विद्युत् प्रवाह (Current) $I_E$ आणि आऊटपुट विद्युतदाब $V_{EC}$ यामधील रिलेशन दाखवते. ग्राफ मध्ये दाखवल्यानुसार आऊटपुट वैशिष्टये (Characteristics) ही कॉन्स्टंट इनपुट विद्युत् प्रवाह (Current) $I_B$ च्या खाली काढली केली आहे.
CC कॉन्फिगरेशन ची आऊटपुट वैशिष्टये (Characteristics) ही CE कॉन्फिगरेशन ची आऊटपुट वैशिष्टये (Characteristics)च्या सारखी आहे.
कारण
$I_C = I_E$ ……( $I_E = I_C + I_B$ बेस विद्युत् प्रवाह (Current) हा नगण्य असतो)

**α आणि मधील β रिलेशनशिप:**

**1. α इन्टम्सऑफ β**

बेस विद्युत् प्रवाह (Current) ऍम्प्लिफिकेशन फॅक्टर(α)- अल्फा हा कलेक्टर विद्युत् प्रवाह (Current) आणि इमीटर विद्युत् प्रवाह (Current) यांचा गुणोत्तर आहे.

$\alpha = I_C / I_E$

इमीटर विद्युत् प्रवाह (Current) ऍम्प्लिफिकेशन फॅक्टर(β)
बीटा हा कलेक्टर विद्युत् प्रवाह (Current) आणि बेस विद्युत् प्रवाह (Current) यांचा गुणोत्तर आहे.

$\beta = I_C / I_B$
इमीटर विद्युत् प्रवाह (Current)
$I_E =/ I_B + I_C$

दोन्ही साईडला IC ने डिव्हाइड करा

$I_E / Ic = I_B / Ic + Ic/Ic$

$I_E / Ic = I_B / Ic + 1$

$1/\alpha = 1/\beta + 1$ [$\because \alpha = Ic/ I_E, \beta = Ic/ I_B$]

$1/\alpha = 1 + \beta/\beta$

त्यामुळे

$\alpha = \beta/1+\beta$ ……………..(1)

**2. β इन्टम्स ऑफ α**

$\alpha = \beta/1+\beta$ …….. इक्वेशन 1वरून
त्यामुळे

$\beta = \alpha + \alpha\beta$

$\beta - \alpha\beta = \alpha$

$\beta(1-\alpha) = \alpha$

$\boldsymbol{\beta = \alpha/(1-\alpha)}$

**CB,CE,CC मधील फरक**

| पॅरामीटर्स | कॉमन बेस(CB) | कॉमन इमीटर(CE) | कॉमन कलेक्टर(CC) |
|---|---|---|---|
| **इनपुट डायनामिक रेझिस्टन्स** | खूप कमी | कमी | खूप जास्त |
| **आउटपुट डायनामिक रेझिस्टन्स** | खूप जास्त | जास्त | कमी |
| **विद्युत् प्रवाह (Current) गेन** | 1 पेक्षा कमी | जास्त | खूप जास्त |
| **विद्युतदाब गेन** | CCपेक्षा जास्त तर CE पेक्षा कमी | सर्वात जास्त | सर्वात कमी |
| **पावर(POWER) गेन** | मिडीयम | सर्वात जास्त | मिडीयम |
| **लिकेज विद्युत् प्रवाह (CURRENT)** | खूप कमी | खूप जास्त | खूप जास्त |
| **इनपुट आउटपुट मधील रिलेशनशिप** | इन फेज | आऊट ऑफ फेज | इन फेज |
| **अनुप्रयोग** | उच्च फ्रिक्वेन्सी एप्लीकेशनस | ऑडिओ फ्रिक्वेन्सी एप्लीकेशनस | इमपिडन्स मॅचिंग करता |

**2.4 बीजेटी (ट्रांझिस्टर) बायसिंग**

**डीसी लोड लाइन-**

**डी सी लोड लाईनची गरज-**

हे योग्य DC ऑपरेटिंग पॉइंट निर्धारित करण्यासाठी वापरले जाते, ज्याला अनेकदा क्यू पॉइंट म्हणतात.ट्रांझिस्टरची DC लोड लाइन दिलेल्या लोडसाठी विद्युत् प्रवाह (Current) आणि विद्युतदाब यामधील संबंध दाखवते.ट्रांझिस्टर एप्लीकेशन एनालिसिस मध्ये वारंवार वापरली जाणारी ही पद्धत आहे.




**आकृती 2.16 कॉमन इमिटर ट्रांझिस्टर परिपथ (सर्किट)**

कन्सिडर कॉमन इमिटर ट्रांझिस्टर परिपथ (सर्किट) आकृती 2.16 मध्ये दाखवल्यानुसार . ज्यामध्ये इनपुटला कोणताही सिग्नल अप्लाय केलेला नाही .




**आकृती 2.17 आउटपुट वैशिष्ट्ये (Characteristics)**

परिपथ (सर्किट)चे आउटपुट वैशिष्ट्ये वरील आकृती 2.17 प्रमाणे आहे. किर्चोफ्फ विद्युतदाब नियम (Kirchoff's Law) कलेक्टर परिपथ (सर्किट)ला अप्लाय केल्यावर आपल्याला खालील इक्वेशन मिळते

$V_{CE}=V_{CC}-I_C.R_C$ ……….(1)

$IC=(-1R_C)/V_{CE}+V_{CC}/Rc$ ……….(2)

y=mx+C

इक्वेशन 2 हे, y=mx+C या फॉर्ममध्ये आहे जे आउटपुट वैशिष्ट्ये (Characteristics) वर स्ट्रेट लाईन रिप्रेझेंट करते. ही डीसी लोड लाइन म्हणून ओळखली जाते,

ही $V_{CE}$ आणि $I_C$ मधील Curve ठरवते, दिलेल्या कोणत्याही Rc व्हॅल्यू साठी.

1.ज्यावेळी कलेक्टर विद्युत् प्रवाह (Current) IC=0 असतो, तेव्हा कलेक्टर इमिटर विद्युतदाब

$V_{CE}=V_{CC}$ इतका असतो.

1.पहिला पॉईंट B, $(V_{CC},0)$

2.जेव्हा कलेक्टर-एमिटर विद्युतदाब VCE= 0 असतो, तेव्हा कलेक्टर विद्युत् प्रवाह (Current)

$I_C=V_{CC}/R_C$ इतका असतो.

दुसरा पॉईंट A $(0, V_{CC}/R_C)$

बिंदू A आणि B जोडून, D.C लोड लाइन दाखवल्याप्रमाणे तयार केली जाते.

**Q-पॉइंट/ किंवा ऑपरेटिंग पॉइंट-**

क्यू पॉइंट किंवा ऑपरेटिंग पॉइंट हा एक स्थिर डीसी विद्युतदाब आणि स्थिर विद्युत् प्रवाह (Current) पातळी दर्शवतो, ज्यावर ट्रांझिस्टर ऑपरेट होतो/ कार्य करतो.

इनपुटला कोणताही सिग्नल दिला जात नसताना $I_C$ (कलेक्टर विद्युत् प्रवाह (Current)) किंवा $V_{CE}$ (कलेक्टर-एमिटर विद्युतदाब) च्या व्हॅल्यू मधून प्राप्त होणारा बिंदू ट्रांझिस्टरमधील ऑपरेटिंग पॉइंट किंवा Q-पॉइंट म्हणून ओळखला जातो. याला ऑपरेटिंग पॉइंट असेही म्हणतात.

Q-पॉइंट ची व्हॅल्यू खाली आकृती 2.18 मध्ये दाखवल्याप्रमाणे डीसी लोड लाइन वरून काढता येते.




**आकृती 2.18 Q-पॉइंट**

ट्रांझिस्टरच्या सुरक्षित ऑपरेशनसाठी आणि योग्य कार्यप्रदर्शनासाठी Q बिंदू अचूकपणे सेट करणे महत्वाचे आहे.

**ऑपरेटिंग पॉइंटची निवड**

डीसी लोड लाईनवर वेगवेगळ्या स्थानांवर ऑपरेटिंग पॉइंट निवडला जाऊ शकतो, संपृक्तता रीजन जवळ, कट ऑफ रीजन जवळ किंवा ऍक्टिव्ह रीजन जवळ. क्यू-पॉइंटची स्थिती ट्रांझिस्टरच्या अनुप्रयोगांवर अवलंबून असते. जर ट्रांझिस्टरचा वापर स्विच म्हणून केला असेल तर ओपन स्विचसाठी क्यू-पॉइंट पोझिशन कटऑफ रीजनमध्ये असेल क्लोज स्विचसाठी, क्यू-पॉइंट संपृक्तता रीजनमध्ये असेल. जेव्हा ट्रांझिस्टर ऍम्प्लिफायर म्हणून म्हणून वापरायचा असेल तेव्हा Q पॉईंट डीसी लोड लाइन, च्या मध्यभागी निवडला पाहिजे.

**Q पॉईंट वर परिणाम करणारी कारणे-**

जेव्हा तापमान बदलते किंवा ट्रांझिस्टर बदलला जातो तेव्हा ऑपरेटिंग पॉइंट देखील बदलतो. ऑपरेटिंग पॉइंट बदलल्यास, ट्रांझिस्टर अयोग्य रीजनमध्ये काम करु शकतो, त्यामुळे डिस्टोर्टेड आउटपुट सिग्नल मिळते .

एकदा ऑपरेटिंग पॉइंट निश्चित झाल्यानंतर, ते स्थिर असणे अपेक्षित आहे. परंतु ऑपरेटिंग पॉइंट (क्यू-पॉइंट) खालील घटकांमुळे त्याचे स्थान बदलू शकतो.

1) ट्रांझिस्टर पॅरामीटर्समधील फरक ($\beta$ आणि VBE) (जेव्हा ट्रांझिस्टर नवीन ट्रांझिस्टरने बदलला जातो)
2) बेस-एमिटर विद्युतदाबमधील फरक ($V_{BE}$)
3) विद्युत् प्रवाह (Current) गेन $\beta$ मधील फरक
4) कलेक्टर विद्युत् प्रवाह (Current) मध्ये कोणतेही बदल ($I_C$)
5) कलेक्टर लीकेज विद्युत् प्रवाह (Current) मधील बदल ($I_{CBO}$)
6) तापमानातील बदल

**थर्मल रनअवे**

थर्मल रनअवे अशा परिस्थितीत उद्भवते जेव्हा तापमानात वाढ झाल्यामुळे परिस्थिती बदलते ज्यामुळे तापमानात आणखी वाढ होते, ज्यामुळे अनेकदा विनाशकारी परिणाम होतो.

थर्मल रनअवे ही द्विध्रुवीय ट्रांझिस्टरमध्ये जंक्शन तापमानात जास्त वाढ असलेल्या इलेक्ट्रो-थर्मलधनफीडबॅकमुळे उद्भवणारी एक घटना आहे. थर्मल रनअवे (किंवा थर्मल अस्थिरता) ची उत्पत्ती कलेक्टर विद्युत् प्रवाह (Current) $I_c$ आयसीच्या सकारात्मक तापमान अवलंबनाशी जवळून संबंधित आहे, जी निश्चित $V_{BE}$ साठी वाढत्या तापमानासह वाढते.

वाढत्या तापमानामुळे वाढत्या कलेक्टर विद्युत् प्रवाह (Current) ची समस्या ही आहे की अधिक विद्युत् प्रवाह (Current) ट्रांझिस्टरद्वारे विसर्जित होणारी पावरवाढवते ,ज्यामुळे त्याचे तापमान वाढते. हे चक्र थर्मल रन अवे म्हणून ओळखले जाते, जे ट्रांझिस्टर खराब करू शकते.




**आकृती 2.19 थर्मल रनअवे**

ट्रांझिस्टरमध्ये थर्मल रन अवे साठी अनेक घटक कारणीभूत ठरू शकतात,

**थर्मल रन अवे ची कारणे**

1.सभोवतालचे उच्च तापमान.

2.डिव्हाइसमधून वाहणारी उच्च विद्युत् प्रवाह (Current) पातळी.

3.पावरअपव्यय (डिसिपेशनची) उच्च पातळी.

बायपोलर ट्रांझिस्टर (BJTs) आणि फील्ड-इफेक्ट ट्रांझिस्टर (FETs) सह कोणत्याही प्रकारच्या ट्रांझिस्टरमध्ये थर्मल रनअवे प्रोसेस उद्भवू शकते. ट्रांझिस्टरमध्ये, थर्मल रनअवे हे सामान्यत:हाय लेवल कलेक्टर विद्युत् प्रवाह (Current) मुळे होते आणि फील्ड-इफेक्ट ट्रांझिस्टरमध्ये, ते हाय लेवल ड्रेन विद्युत् प्रवाह (Current) मुळे होते. दोन्ही बाबतीत, तापमानात वाढ झाल्यामुळे ट्रांझिस्टर अधिक कनडक्टिव्ह बनू शकते, ज्यामुळे विद्युत् प्रवाह (Current) वाढतो आणि तापमानात आणखी वाढ होते.

**थर्मल रनअवे टाळण्यासाठी उपाय योजना-**

1.ट्रांझिस्टर त्याच्या प्रमाणित तापमान आणि पावर(Power) क्षमतामध्येच वापरला गेला पाहिजे

2.अतिरीक्त उष्णता नष्ट करण्यासाठी उष्णतारोधक किंवा इतर कुलिंग उपकरणे वापरणे.

3.उच्च पावररेटिंगसह ट्रांझिस्टर वापरणे.

4.थर्मल रन अवे साईड इफेक्ट कमी करण्यासाठी योग्य परिपथ (सर्किट) डिझाइन तंत्र वापरणे देखील महत्त्वाचे आहे. आवश्यक विद्युत् प्रवाह (Current) आणि पावर(Power) लेव्हल साठी योग्य बायसिंग टेक्निक वापरणे गरजेचे आहे की जेणेकरून ट्रांझिस्टर स्थिर रीजनमध्ये कार्यक्षम राहील.

**उष्णतारोधक (Heatsink)**

सेमीकंडक्टर उपकरणांमध्ये उष्णतारोधकचे कार्य तापमान वाढ नियंत्रित करणे आहे. उष्णतारोधक एकतर ॲल्युमिनियम किंवा तांबे किंवा इतर कोणत्याही सामग्रीचे बनलेले असतात, जे उष्णतेचे चांगले वाहक असतात. ट्रांझिस्टरच्या अतिरिक्त उष्णतेचे उत्सर्जन करण्यासाठी ट्रांझिस्टरमध्ये उष्णतारोधकचा वापर केला जातो.

उष्णतारोधक बनवण्यासाठी तांबे हा उत्तम पदार्थ आहे कारण त्याची कण्डक्टिव्हिटी सुद्धा जास्त आहे पण कमी किमंतीमुळे तसेच लाईट वेट असल्यामुळेआणि चांगली कंडक्टिव्हिटी पण असल्यामुळे ॲल्युमिनियम चा जास्त वापर केला जातो उष्णतारोधक निर्माण करण्यासाठी.

उष्णतारोधक हाय टेम्परेचर कंपोनंट, जसं की ट्रांझिस्टर मधून उष्णता कमी तापमानचे मिडीयम जसं की हवा ,तेल, पाणी किंवा इतर कोणत्याही योग्य मिडीयम कडे कंडक्शन आणि संवहनाद्वारे ट्रान्स्फर करते.

**ट्रांझिस्टर बायसिंग**

ट्रांझिस्टर बायसिंग ही ट्रांझिस्टरचे डीसी ऑपरेटिंग विद्युतदाब किंवा विद्युत् प्रवाह (Current) योग्य मूल्यावर ठेवण्याची प्रक्रिया आहे की ज्यामुळे ट्रांझिस्टर कोणत्याही एसी इनपुट सिग्नल ला योग्य पद्धतीने ऍम्प्लिफाय करू शकेल .

ट्रांझिस्टर हे सर्वात मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या सेमीकंडक्टर उपकरणांपैकी एक आहे, जे ऍम्प्लिफिकेशन आणि स्विचिंगसह विविध प्रकारच्या अनुप्रयोगांसाठीसाठी वापरले जाते. हे फंक्शन्स योग्य काम होण्यासाठी ट्रांझिस्टरला विशिष्ट प्रमाणात विद्युतदाब आणि विद्युत् प्रवाह (Current) प्रदान करणे आवश्यक आहे.

ट्रांझिस्टर परिपथ (सर्किट)साठी या कंडिशन्स सेट करण्याच्या प्रक्रियेस ट्रांझिस्टर बायसिंग म्हणतात.

**ट्राजिस्टर बायसिंग चे प्रकार**

1.फिक्सड बायसिंग

2.बेस बायस विथ इमीटर फीडबॅक

3.इमीटर बायस

4.इमीटर फीडबॅक बायस

4.कलेक्टर फीडबॅक बायस

5. विद्युतदाब डीवायडर (divider)

**1.फिक्सड बायसिंग**




**आकृती 2.20 फिक्सड बायसिंग**

वरील आकृती 2.20 मध्ये दाखवल्यानुसार बेस रजिस्टर $R_B$ हा बेस आणि $V_{CC}$ मध्ये जोडलेला आहे. $I_B$ विद्युत् प्रवाह (Current) प्रवाहित झाल्यामुळे, $R_B$ रजिस्टर अक्रॉस विद्युतदाब ड्रॉप होतो, त्यामुळे बेस् इमिटर जंक्शन फॉरवर्ड बायस मध्ये काम होते. इथे $V_{CC}$ आणि $V_{BE}$ ची व्हॅल्यू फिक्स आहेत तसेच $R_B$ ची व्हॅल्यू स्थिर आहे.

$$I_B = \frac{V_{CC} - V_{BE}}{R_B}$$

यामुळे $I_B$ ची कॉन्स्टंट व्हॅल्यू मिळते परिणामी एक स्थिर ऑपरेटिंग पॉईंट बनतो. ज्यामुळे परिपथ (सर्किट)ला फिक्स बेस बायस असे नाव दिले आहे. फिक्सड बायस हे सर्वात सिम्पल आणि कमी कंपोनंट वापरून बनवलेले परिपथ (सर्किट) आहे, शिवाय $R_B$ ची व्हॅल्यूमध्ये बदल करून ऑपरेटिंग पॉईंट ऍक्टिव्ह(active) रीजनमध्ये मध्ये कुठेही स्थलांतरीत करू शकतो.

**2.बेस बायस विथ इमीटर फीडबॅक**




**आकृती 2.21 बेस बायस विथ इमीटर फीडबॅक**

बेस बायस विथ इमीटर फीडबॅक आकृती 2.21 मध्ये दाखवल्यानुसार आहे. या प्रकारच्या बायसिंग पद्धतीमध्ये मध्ये दोन्ही, कलेक्टर बेस फीडबॅक आणि इमीटर बेस फीडबॅक वापरल्यामुळे जास्त स्टॅबिलिटी मिळते. वरील आकृतीमध्ये दाखवल्यानुसार येथे, $I_E$ विद्युत् प्रवाह (Current) वहन झाल्यामुळे इमिटर रजिस्टर $I_E$ च्या अक्रॉस जो विद्युतदाब ड्रॉप होतो त्यामुळे एमिटर-बेस जंक्शन फॉरवर्ड बायस्ड होते. टेंपरेचर मध्ये वाढ झाल्यामुळे कलेक्टर विद्युत् प्रवाह (Current) $I_C$ मध्ये वाढ होते परिणामी इमिटर विद्युत् प्रवाह (Current) $I_E$ सुद्धा वाढतो. ज्यामुळे रजिस्टर $R_E$ च्या अक्रॉस विद्युतदाब ड्रॉप वाढतो आणि कलेक्टर होल्टेज $V_C$ आणि बेस विद्युत् प्रवाह (Current) $I_B$ कमी होतो याच्या एकत्र इफेक्ट मुळे $I_C$ त्याची ओरिजनल व्हॅल्यू रिटेन करतो. याचा परिणाम डीजनरेटिव्ह (degenerative) फीडबॅकमुळे आउटपुट गेन कमी होतो ज्याला अनवांटेड एसी फीडबॅक म्हणू शकतो. लार्ज बायपास कॅपॅसिटर इमिटर रजिस्टरच्या अक्रॉस कनेक्ट केल्यास हा इफेक्ट कमी करता येतो.

$$I_{RB} = 0.1 I_C = I_B + I_1$$
$$V_E = I_E R_E = 0.1 V_{CC}$$
$$V_C = V_{CC} - (I_C + I_{RB}) R_C$$
$$V_B = V_{BE} + V_E = I_1 R_1 = V_C - (I_1 + I_B 0 R_B$$
$$I_C = \beta I_B, \;\; I_E \approx I_C$$

**3. विद्युतदाब डिव्हायडर बायस**




**आकृती 2.22. विद्युतदाब डिव्हायडर बायस**

विद्युतदाब डिव्हायडर बायस आकृती 2.22 मध्ये दाखवल्यानुसार आहे. विद्युतदाब डिव्हायडर बायस याला एमिटर विद्युत् प्रवाह (Current) बायस असेही म्हणतात, हे तीन मूलभूत ट्रांझिस्टर बायसिंग सर्किट्सपैकी सर्वात स्थिर आहे. विद्युतदाब डिव्हायडर बायस परिपथ (सर्किट) आकृतीमध्ये दाखवला आहे. एमिटरसह सिरीज (series) मध्ये एमिटर रेझिस्टर $R_E$ जोडलेले असल्याचे दिसून येते, जेणेकरून ट्रांझिस्टरसह सिरीज मध्ये एकूण डी.सी (DC) लोड ($R_c$+ $R_E$ ) असेल आणि आणि परिपथ (सर्किट)साठी डी.सी (DC) लोड लाइन(load line) काढताना हा रेसिस्टन्स वापरला जाणे आवश्यक आहे. रेझिस्टर $R_1$ आणि $R_2$ हे विद्युतदाब डिव्हायडर बनवतात, जे बेस बायस विद्युतदाब तयार करण्यासाठी सप्लाय विद्युतदाब डिव्हाइड करतात. विद्युतदाब डिव्हायडर बायस सर्किट्स सामान्यत: विद्युतदाब डिव्हायडर विद्युत् प्रवाह (Current) ($I_1$), ट्रांझिस्टर बेस विद्युत् प्रवाह (Current) ($I_B$) पेक्षा खूप मोठा असण्यासाठी डिझाईन केलेला असतो. $I_B$ हा $V_{BE}$ वर मोठ्या प्रमाणात परिणाम करतो. त्यामुळे $V_{BE}$ कॉन्स्टंट राहील असे गृहीत धरले जाते. $V_B$ ला कॉन्स्टंट ठेवले तर इमिटर रजिस्टर च्या अक्रॉस चे विद्युतदाब पण कॉन्स्टंट राहते याचा अर्थ इमिटर विद्युत् प्रवाह (Current) कॉन्स्टंट आहे. कलेक्टर विद्युत् प्रवाह (Current) जवळपास इमिटर विद्युत् प्रवाह (Current) इतका असतो त्यामुळे $I_C$ कॉन्स्टंट राहतो.
ट्रांझिस्टर कलेक्टर टू एमिटर विद्युतदाब,

$$V_{CE} = V_{CC} - (I_C + I_B).R_C$$

जर Ic आणि IE कॉन्स्टंट राहिले तर ट्रांझिस्टर कलेक्टर- एमिटर विद्युतदाब सुद्धा कॉन्स्टंट राहते.

**सोडवलेली उदाहरणे:**

**1.**कॉमन बेस कनेक्शनमध्ये, $I_E$= 1mA, $I_C$ = 0.95mA. $I_B$ ची व्हॅल्यू मोजा.

$$I_E = I_B + I_C$$
$$1 = I_B + 0.95$$
$$I_B = 1 - 0.95 = 0.05 \text{ mA}$$

**2.**कॉमन बेस कनेक्शनमध्ये विद्युत् प्रवाह (Current) ॲम्प्लिफीकेशन फॅक्टर=0.9 आहे, एमिटर विद्युत् प्रवाह (Current) $I_E$= 1mA आहे ,तर बेस विद्युत् प्रवाह (Current) ची मूल्य काढा.

$$\text{Here, } \alpha = 0.9, \quad I_E = 1\text{ mA}$$
$$\alpha = \frac{I_C}{I_E}$$
$$I_C = \alpha I_E = 0.9 \times 1 = 0.9\text{ mA}$$
$$I_E = I_B + I_C$$
$$\text{Base current, } I_B = I_E - I_C = 1 - 0.9 = 0.1\text{ mA}$$

**3.** $\beta$ ची व्हॅल्यू काढा. जर (i) $\alpha$= 0.9 (ii) $\alpha$= 0.98 (iii) $\alpha$= 0.99.

i) $\beta = \frac{\alpha}{1-\alpha} = \frac{0.9}{1-0.9} = 9$

ii) $\beta = \frac{\alpha}{1-\alpha} = \frac{0.98}{1-0.98} = 49$

iii) $\beta = \frac{\alpha}{1-\alpha} = \frac{0.99}{1-0.99} = 99$

**4**. ट्रांझिस्टरमध्ये $I_E$ ची व्हॅल्यू काढा. ज्यासाठी $\beta$ = 50 आणि IB = 20 μA.

$$\beta = 50, \quad I_B = 20\mu\text{A} = 0.02\text{ mA}$$
$$\beta = \frac{I_C}{I_B}$$
$$I_C = \beta I_B = 50 \times 0.02 = 1\text{ mA}$$
$$I_E = I_B + I_C = 0.02 + 1 = 1.02\text{ mA}$$

**5**.ट्रांझिस्टरमधील कलेक्टर लीकेज विद्युत् प्रवाह (Current) सीई कॉन्फिगरेशन व्यवस्थेमध्ये 300 μA आहे, जर आता ट्रांझिस्टर CB कॉन्फिगरेशन मध्ये कनेक्ट केला तर दिलेल्या बीटा साठी लिकेज विद्युत् प्रवाह (Current) ची व्हॅल्यू काढा , $\beta$ = 120.

$$I_{CEO} = 300\ \mu\text{A}$$
$$\beta = 120 \ ; \ \alpha = \frac{\beta}{\beta+1} = \frac{120}{120+1} = 0.992$$
$$I_{CEO} = \frac{I_{CBO}}{1-\alpha}$$
$$I_{CBO} = (1-\alpha)\, I_{CEO} = (1-0.992) \times 300 = 2.4\ \mu\text{A}$$

**6**. ट्रांझिस्टरमध्ये $I_B = 20\ \mu A$ , $I_C = 2$ mA and $\beta = 80$ तर $I_{CBO}$ ची मूल्य काढा.

$$I_C = \beta I_B + I_{CEO}$$
$$2 = 80 \times 0.02 + I_{CEO}$$
$$I_{CEO} = 2 - 80 \times 0.02 = 0.4 \text{ mA}$$
$$\alpha = \frac{\beta}{\beta + 1} = \frac{80}{80 + 1} = 0.988$$
$$I_{CBO} = (1 - \alpha)\ I_{CEO} = (1 - 0.988) \times 0.4 = 0.0048 \text{ mA}$$

**स्वाध्याय:**

1. ट्रांझिस्टर परिभाषित करा. त्याचे प्रकार सांगा.
2. N-P-N आणि P-N-P ट्रांझिस्टरचे चिन्ह काढा.
3. कोणतेही दोन BJT बायसिंग सर्किट्स ऑपरेटिंग पॉइंटच्या संदर्भात सूचीबद्ध करा.
4. ट्रांझिस्टरचे अल्फा($\alpha$) आणि बीटा($\beta$) परिभाषित करा आणि त्यांच्यातील संबंध सांगा.
5. विविध क्षेत्रांच्या योग्य लेबलिंगसह CE कॉन्फिगरेशनची इनपुट आणि आउटपुट वैशिष्ट्ये(Characteristics) काढा.
6. ट्रांझिस्टर अनुप्रयोग सांगा.
7. N-P-N ट्रांझिस्टरच्या ऑपरेटिंग तत्त्वाचे स्पष्टीकरण करा.
8. विद्युतदाब डिव्हायडर(divider) बायसिंग परिपथ (सर्किट) आकृतीसह स्पष्ट करा आणि त्याचे दोन फायदे सांगा.
9. ट्रांझिस्टरचा $\alpha$ 0.9 असल्यास, $\beta$ ची गणना करा.

**संदर्भ (Reference):**

| Sr.No | Author | Title | Publisher with ISBN Number |
|---|---|---|---|
| 1 | V .K. Mehta ,Rohit Mehta | Principles of Electronics | S.Chand and Company Ram Nagar, New Delhi-110 055,11th edition 2014, ISBN 9788121924504 |
| 2 | Mottershead, Allen | Electronic Devices and Circuit: An introduction | Goodyear Publishing Co. New Delhi ISBN: 9780876202654 |
| 3 | links | 1. https://www.tutorialspoint.com<br>2. https://testbook.com/<br>3. https://www.electronics-tutorials | |

# युनिट - 3

## BJT प्रवर्धक
## (BJT Amplifier)

**विषय निष्पत्ती (Course Outcome):**

BJT चा प्रवर्धक ( ऍम्प्लिफायर) आणि स्विच म्हणून वापर.

Use of BJT as amplifier and switch .

**युनिट निष्पत्ती (Unit Outcome):**

3.a दिलेल्या प्रकारच्या प्रवर्धकाच्या (ऍम्प्लिफायरच्या) कार्याचे तत्त्व आकृतीसह वर्णन करणे.
Explain with sketches the working principle of the given type of amplifier.

3.b सिंगल स्टेज ट्रांझिस्टर प्रवर्धकाच्या (ऍम्प्लिफायरच्या) कार्याचे वर्णन करा
Describe working of Single Stage Transistor Amplifier.

3.c विद्युतदाब गेन आणि बँडविड्थची गणना करा.
Calculate Voltage gain and bandwidth

3.d मल्टीस्टेज ऍम्प्लिफायरच्या कार्याचे वर्णन करा
Describe working of Multistage amplifiers

3.e स्विच म्हणून बीजेटीच्या कार्याचे वर्णन करा
Describe working of BJT as a Switch

**परिचय:**

सिग्नल पातळी वाढवण्यासाठी ॲम्प्लीफायरचा वापर केला जातो. हे लहान सिग्नल इनपुटमधून मोठे सिग्नल आउटपुट मिळविण्यासाठी वापरले जाते. ॲम्प्लीफायरच्या इनपुटवर साइनसॉइडल सिग्नल दिले जाते. आउटपुटवर, इनपुटच्या वारंवारतेप्रमाणेच सिग्नल वेव्हफॉर्ममध्ये साइनसॉइडल राहणे आवश्यक आहे. ट्रांझिस्टरला ॲम्प्लीफायर म्हणून काम करण्यासाठी, सक्रिय रिजनमध्ये कार्यरत करण्यासाठी बायस असणे आवश्यक आहे. याचा अर्थ बेस-एमिटर जंक्शन फॉरवर्ड बायस् आहे आणि बेस-कलेक्टर जंक्शन रिव्हर्स बायस् आहे.

3.1 प्रवर्धक (ऍम्प्लिफायर Amplifier):-

**व्याख्या:** असे इलेक्ट्रॉनिक सर्किट जे इनपुट सिग्नल वाढवते त्याला "**ऍम्प्लिफायर**" म्हणतात. हे महत्त्वाचे आहे की मॅग्निफाइड आउटपुट सिग्नल चे रूप (shape of the signal) इनपुट सिग्नल सारखेच असणे आवश्यक आहे.

उदाहरणार्थ :- जर इनपुट सिग्नल हि एक साइनवेव्ह असेल तर मॅग्निफाइड आउटपुट सिग्नल देखील साइनवेव्ह असणे आवश्यक आहे आणि त्याच बरोबर त्यांची फ्रिक्वेन्सी ही समान असणे गरजेचे आहे.




**आकृती 3.1 ऍम्प्लिफायराची (Amplifier) ब्लॉक डायग्रॅम**

प्रवर्धन (ऍम्प्लिफिकेशन): -

**व्याख्या** : **ऍम्प्लिफिकेशन** हि इनपुट सिग्नलची पावर वाढवण्याची प्रक्रिया आहे.

**3.1.1 ऍम्प्लिफायर वर्गीकरण:-**

ऍम्प्लिफिकेशन वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे-

1) इनपुट सिग्नलनुसार (According to Input Signal)
   - i.लघु संदेश ऍम्प्लिफायर (Small Signal Amplifier)
   - ii.उच्च संदेश ऍम्प्लिफायर (Large Signal Amplifier)

2) आउटपुट सिग्नल संदेशनुसार (According to Output Signal)
   - i. विद्युत दाब ऍम्प्लिफायर (Voltage Amplifier)
   - ii. पावर ऍम्प्लिफायर (Power Amplifier)

3) ट्रांझिस्टर कॉन्फिगरेशननुसार
   - i. कॉमन इमिटर ऍम्प्लिफायर ( Common emitter 'CE' amplifier )
   - ii.कॉमन बेस ऍम्प्लिफायर ( Common base 'CB' amplifier )
   - iii.कॉमन कलेक्टर ऍम्प्लिफायर ( Common collector 'CC' amplifier )

1) बायसिंग अटीनुसार (According to position of operating point Q)
   - i. क्लास ए ऍम्प्लिफायर (Class A Amplifier)
   - ii. क्लास बी ऍम्प्लिफायर (Class B Amplifier)
   - iii. क्लास एबी ऍम्प्लिफायर (Class AB Amplifier)
   - iv. क्लास सी ऍम्प्लिफायर (Class C Amplifier)

2) चरणांच्या संख्येनुसार (According to number of stages)
   - i. सिंगल स्टेज ऍम्प्लिफायर(Single stage amplifier)
   - ii. मल्टीस्टेज ऍम्प्लिफायर (Multistage amplifier)

3) फ्रिक्वेंसी श्रेणीनुसार (According to frequency)
   - i. ऑडिओ फ्रिक्वेन्सी ऍम्प्लिफायर (AF Amplifier)
   - ii. रेडिओ फ्रिक्वेन्सी ऍम्प्लिफायर (RF Amplifier)
   - iii. अल्ट्रा-हाय फ्रिक्वेन्सी ऍम्प्लिफायर (UHF Amplifier)

4) कपलिंग पद्धतीनुसार (According to Types of Coupling)
   - i. डायरेक्ट कपल्ड ऍम्प्लिफायर (Direct Coupled Amplifier)
   - ii. रेझिस्टर-कपॅसिटर कपल्ड ऍम्प्लिफायर (RC Coupled Amplifier)
   - iii. ट्रान्सफॉर्मर-कपल्ड ऍम्प्लिफायर (Transformer Coupled Amplifier).

**3.1.2 BJT वर आधारित ॲम्प्लिफायर (BJT as an amplifier):-**




**आकृती 3.2 BJT वर आधारित ॲम्प्लिफायर**

आकृती 3.2 मध्ये ट्रांझिस्टर CE कॉन्फिगरेशन मध्ये वापरला आहे. बाहेर जाणारा विद्युत दाब (Output Voltage) Vo कलेक्टर पासून घेतले जाते. Output voltage Vo = $V_{CE}$. आत येणाऱ्या विद्युत दाब Vin मध्ये थोडा जरी बदल झाल्यास, बेसचा विद्युत् प्रवाह (Current) $I_B$ मध्ये सुद्धा थोडा बदल होतो, पण कलेक्टर विद्युत् प्रवाह (Current) Ic मध्ये खुप मोठ्या प्रमाणात बदल होऊन आउटपुट विद्युतदाब वाढते, म्हणजेच विद्युत दाबाचे प्रवर्धन होते.

**3.2 सिंगल स्टेज CE ॲम्प्लिफायर (Single stage CE amplifier):-**




**आकृती 3.3 सिंगल स्टेज CE ॲम्प्लिफायर**

आकृती 3.3 सिंगल स्टेज CE ॲम्प्लिफायर दर्शवते. परिपथ (सर्किट)मध्ये वापरलेल्या विविध घटकांचे (Components) कार्य पुढीलप्रमाणे-

1) रेझिस्टर $R_1$, $R_2$ आणि $R_E$ ने विद्युतदाब डिव्हायडर बायसिंग तयार केले आहे. हे ऑपरेटिंग पॉईंट चे चांगले स्थिरीकरण (Stability) प्रदान करते.

**2) इनपुट कपॅसिटर $C_1$: -**

इनपुट कपॅसिटर $C_1$ कपलिंग कपॅसिटर म्हणून कार्य करतो, तो आत येणारा प्रवाह संदेश ट्रांझिस्टरच्या बेसला जोडतो. तो फक्त AC संदेश पास करतो आणि DC संदेश ब्लॉक करतो.

**3) बायपास कपॅसिटर $C_E$:-**

कपॅसिटर $C_E$ ला बायपास कॅपॅसिटर असे म्हणतात. हा कपॅसिटर रेझिस्टर $R_E$ च्या समांतर जोडला जातो. हा AC संदेश साठी लो रेसिस्टन्स मार्ग (Path) तयार करतो. जर हा कपॅसिटर वापरले नसेल तर ऍम्प्लिफाईड AC संदेश रेझिस्टर $R_E$ मधून वाहत राहिल्याने त्यामध्ये विद्युत दाब ( Voltage Drop $I_ER_E$) वाढत जाईल, व त्यामुळे बाहेर जाणारा विद्युत् प्रवाह (Current) कमी होईल.

**4) आऊटपुट कपॅसिटर $C_2$: -**

आऊटपुट कपॅसिटर $C_2$ सुद्धा कपलिंग कपॅसिटर म्हणून कार्य करतो, तो ट्रांझिस्टरच्या कलेक्टरला तयार झालेला मोठा (मॅग्निफाइड) संदेश आऊटपुटला जोडतो.

**इनपुट आउटपुट वेव्हफॉर्म:-**




**आकृती 3.4 सिंगल स्टेज CE ऍम्प्लिफायर** इनपुट आउटपुट वेव्हफॉर्म

**फेज रिव्हर्सल (Phase reversal):-**

आकृती 3.3 मध्ये दर्शविलेल्या कॉमन इमीटर CE ऍम्प्लिफायरामध्ये इनपुट AC सिग्नल ट्रांझिस्टरच्या बेस इमीटर टर्मिनल्सवर जोडला आहे आणि आउटपुट सिग्नल कलेक्टर पासून घेतला आहे.

आकृती 3.4-इनपुट सिग्नलच्या पॉझिटीव्ह हाफ सायकल (Positive Half Cycle) दरम्यान, जेव्हा इनपुट AC सिग्नल चा विद्युत दाब वाढतो, परिणामी बेस विद्युत् प्रवाह (Current) (Current $I_B$) वाढतो, कलेक्टर विद्युत् प्रवाह (Current) ($I_C$) वाढतो. त्यामुळे विद्युतदाब ड्रॉप IcRc वाढतो, त्यामुळे आउटपुट विद्युतदाब $V_{CE}$ कमी होतो आणि आउटपुट सिग्नल वर आपल्याला ऋण हाफ सायकल (Negative Half cycle) मिळते.

या प्रमाणेच, इनपुट सिग्नल च्या ऋण हाफ सायकल दरम्यान, जेव्हा इनपुट AC सिग्नल चा विद्युत दाब कमी होतो, परिणामी बेस विद्युत् प्रवाह (Current) ($I_B$) कमी होतो, कलेक्टर विद्युत् प्रवाह (Current) ($I_C$) कमी होतो. त्यामुळे विद्युतदाब ड्रॉप IcRc कमी होतो, त्यामुळे आउटपुट विद्युतदाब $V_{CE}$ वाढतो आणि आउटपुट सिग्नल वर आपल्याला पॉझिटीव्ह हाफ सायकल मिळते.

**फ्रिक्वेन्सी रिस्पॉन्स:-**

व्याख्या: - ऍम्प्लिफायराचा फ्रिक्वेन्सी रिस्पॉन्स (Frequency Response) म्हणजे ऍम्प्लिफायरमधून बाहेर जाणाऱ्या विद्युत दाबाची वृद्धी व इनपुट सिग्नलच्या फ्रिक्वेन्सीचा आलेख आहे.




**आकृती 3.5 सिंगल स्टेज CE ऍम्प्लिफायर (Amplifier) फ्रिक्वेन्सी रिस्पॉन्स**

1) कमी फ्रिक्वेन्सी विभाग (Low Frequency Region): -

कमी फ्रिक्वेन्सी वर आत येणाऱ्या प्रवाह करिता कपॅसिटर Cin आणि कपलिंग कपॅसिटर Cc ची रिऍक्टन्स (Reactance) खूप जास्त असतो , त्यामुळे बाहेर जाणारा प्रवाह व वृद्धी कमी होते. आत येणारा प्रवाह AC सिग्नलची फ्रिक्वेंसी वाढल्याने कपॅसिटरचा रिऍक्टन्स(Reactance) कमी होतो आणि त्यामुळे बाहेर जाणारा प्रवाह वाढू शकते, जे कमी फ्रिक्वेन्सी रीजनमध्ये दर्शविले आहे.

2) मध्य फ्रिक्वेन्सी विभाग ( Medium Frequency Region):-या विभागात इनपुट कपॅसिटर $C_{in}$ आणि कपलिंग कपॅसिटर $C_C$ जवळजवळ शॉर्ट परिपथ (सर्किट) म्हणून कार्य करते. त्यामुळे बाहेर जाणारा प्रवाह व वृद्धी स्थिर राहते, जे मध्य फ्रिक्वेन्सी रीजनमध्ये फ्लॅट फ्रिक्वेंसी रिस्पॉन्स द्वारे दर्शविले आहे.

3) उच्च फ्रिक्वेन्सी विभाग (High Frequency Region):-

खूप जास्त फ्रिक्वेन्सीमध्ये बाहेर जाणारा प्रवाह व वृद्धी ट्रांझिस्टर अंतर्गत कॅपॅसिटन्स आणि स्ट्रे कॅपेसिटन्समुळे कमी होईल, जे उच्च फ्रिक्वेन्सी रीजनमध्ये दर्शविले जाते.

**ऍम्प्लिफायरची बॅंडविड्थ:-**




**आकृती 3.6 अम्प्लीफायरचा फ्रिक्वेंसी रिस्पॉन्स आणि बॅंडविड्थ**

व्याख्या:- अप्पर कट ऑफ फ्रिक्वेन्सी आणि लोअर कट ऑफ फ्रिक्वेन्सी यातील फरकाला बॅंडविड्थ म्हणतात. ऍम्प्लिफायरच्या फ्रिक्वेन्सी रिस्पॉन्स वरून बॅण्डविड्थची गणना करता येते.

Bandwidth (BW) = $F_H$-$F_L$

Where,

$F_H$= Upper or higher cutoff frequency=अप्पर कट ऑफ फ्रिक्वेन्सी

$F_L$= Lower cutoff frequency =लोअर कट ऑफ फ्रिक्वेन्सी

**उदाहरणे:**

प्रश्न 1:- ऍम्प्लिफायरमध्ये, 2 kHz वर कमाल विद्युतदाब गेन 2000 आहे. 10 kHz आणि 50 Hz वर किमान विद्युतदाब गेन 1414 आहे. तर

(i) बॅंडविड्थ (ii) लोअर कट-ऑफ फ्रिक्वेंसी (iii) अप्पर कट-ऑफ फ्रिक्वेंसी शोधा

उत्तर-



दिलेले :-

अप्पर कट-ऑफ फ्रिक्वेंसी (F2)= 10 KHz=10000 Hz

लोअर कट-ऑफ फ्रिक्वेंसी (F1)= 50 Hz

बँडविड्थ =F2-F1=10000-50=9950 Hz

**प्रश्न 2:-** CE ऍम्प्लिफायरचे इनपुट 1mv आणि आउटपुट 1 v आहे, ऍम्प्लिफायरच्या विद्युतदाब वाढीची गणना करा.

**उत्तर-** दिलेले- इनपुट =1 mV

आउटपुट = 1 V

विद्युतदाब मिळवणे Gain = output / input=1V/1mV=1000

**3.3 मल्टीस्टेज ऍम्प्लिफायर (Multistage Amplifier): -**

मल्टीस्टेज ऍम्प्लिफायराची गरज :-सिंगल स्टेज ऍम्प्लिफायर मधून मिळणारी वृद्धी काही उपयोगामध्ये लोड चालवण्यासाठी अपुरी आहे.जास्त वृद्धी मिळवण्यासाठी आपल्याला ऍम्प्लिफायरच्या एकापेक्षा जास्त स्टेजेसचा वापर करावा लागतो, अशा ऍम्प्लिफायरला मल्टीस्टेज ऍम्प्लिफायर असे म्हणतात.

व्याख्या:- असे परिपथ(सर्किट) ज्यामध्ये ऍम्प्लिफायराच्या एकापेक्षा जास्त स्टेजेस असतात त्याला मल्टीस्टेज ऍम्प्लिफायर असे म्हणतात.




**आकृती 3.7 मल्टीस्टेज ऍम्प्लिफायर ( Multistage Amplifier)**

मल्टीस्टेज ऍम्प्लिफायर (Amplifier)चा एकूण वृद्धी (Total gain) =

$$A_V = A_{V_1} \times A_{V_2} \times A_{V_3} ...... \times A_{n-1} \times A_n$$

**सोडवलेली उदाहरणे:**

**प्रश्न 1:-** थ्री-स्टेज अम्प्लीफायमध्ये पहिल्या टप्प्यातील विद्युतदाब वाढ 100, दुसऱ्या टप्प्यातील विद्युतदाब वाढ 200 आणि तिसऱ्या टप्प्यातील विद्युतदाब वाढ 400 आहे. एकूण विद्युतदाब गेन db मध्ये शोधा.

**उत्तर:-**

पहिल्या टप्प्यातील विद्युतदाब गेन( db) = 20 $\log_{10}$ 100 = 40

दुसऱ्या टप्प्यातील विद्युतदाब गेन (db) = 20 log10 200 = 46

थर्ड-स्टेज विद्युतदाब गेन (db) = 20 log10 400 = 52

∴ एकूण विद्युतदाब गेन = 40 + 46 + 52 = 138 db

**प्रश्न 2:-** 3 स्टेज ऍम्प्लिफायर मध्ये अनुक्रमे 20, 30 आणि 55 चा विद्युतदाब वाढतो. ऍम्प्लिफायरचा एकूण विद्युतदाब वाढ शोधा.

**उत्तर:-** विद्युतदाब गेन 1=Av1=20

विद्युतदाब गेन 2= Av2=30

विद्युतदाब गेन 3= Av3=55

ऍम्प्लिफायरचा एकूण विद्युतदाब वाढ = Av1 XAv2 XAv3= 20X30X55=33000.

**3.4 मल्टीस्टेज ऍम्प्लिफायराचे प्रकार:-**

परिपथ (सर्किट)मध्ये वापरल्या जाणाऱ्या कपलिंग घटकांवर अवलंबून, मल्टीस्टेज ऍम्प्लिफायराचे विविध प्रकार खालीलप्रमाणे आहेत-

1) रेझिस्टर आणि कॅपॅसिटरने जोडलेले ऍम्प्लिफायर (RC Coupled Amplifier)

2) ट्रान्सफॉर्मरने जोडलेले ऍम्प्लिफायर (Transformer Coupled Amplifier)

3) डायरेक्ट जोडलेले ॲम्प्लिफायर (Direct coupled amplifier)

**3.4.1 RC कपल्ड ॲम्प्लिफायर (RC coupled amplifier): -**




**आकृती 3.8 RC कपल्ड ॲम्प्लिफायर**

आकृती 3.8 दोन स्टेज RC कपल्ड ॲम्प्लिफायर (Two stage RC Coupled Amplifier) दर्शवते. पहिल्या स्टेज मधून बाहेर जाणारा प्रवाह दुसऱ्या स्टेजच्या आत येणाऱ्या प्रवाह ला जोडलेला आहे. दोन स्टेज जोडण्यासाठी रेझिस्टर आणि कॅपॅसिटर चा वापर केलेला आहे म्हणून त्याला RC coupled amplifier असे म्हणतात .

परिपथ (सर्किट)मध्ये वापरलेल्या विविध घटकांचे (Components) कार्य पुढीलप्रमाणे-

1) रेझिस्टर $R_1$, $R_2$ आणि $R_E$ ने विद्युतदाब डिव्हायडर बायसिंग तयार केले आहे. हे ऑपरेटिंग पॉईंट चे चांगले स्थिरीकरण (स्टेबल Q पॉइंट) प्रदान करते.

2) इनपुट कपॅसिटर $C_1$: - इनपुट कपॅसिटर $C_1$ कपलिंग कपॅसिटर म्हणून कार्य करतो, तो आत येणारा प्रवाह संदेश ट्रांझिस्टरच्या बेसला जोडतो. तो फक्त AC संदेश पास करतो आणि DC संदेश ब्लॉक करतो.

3) बायपास कपॅसिटर $C_E$: - कॅपॅसिटर $C_E$ ला बायपास कॅपॅसिटर असे म्हणतात. हा कपॅसिटर रेझिस्टर $R_E$ च्या समांतर जोडला जातो. हा AC संदेश साठी लोरेसिस्टन्स मार्ग (Low Resistance Path) तयार करतो. जर हा कपॅसिटर वापरले नसेल तर ॲम्प्लिफाईड AC संदेश रेझिस्टर $R_E$ मधून वाहत राहिल्याने त्यामध्ये विद्युत दाब ( Voltage Drop $I_E R_E$) वाढत जाईल, व त्यामुळे बाहेर जाणारा विद्युत् प्रवाह (Current) कमी होईल.

4) आऊटपुट कपॅसिटर $C_2$: - आऊटपुट कपॅसिटर $C_2$ सुद्धा कपलिंग कपॅसिटर म्हणून कार्य करतो, तो ट्रांझिस्टरच्या कलेक्टरला तयार झालेला मोठा (मॅग्निफाइड) संदेश लोडला ($R_L$) जोडतो.

5) कॅपलिंग कपॅसिटर $C_C$:- कॅपलिंग कपॅसिटर Cc दोन स्टेज जोडण्याची काम करतो.

**RC कपल्ड ॲम्प्लिफायर फ्रिक्वेन्सी रिस्पॉन्स: -**




**आकृती 3.9 RC कपल्ड ॲम्प्लिफायर फ्रिक्वेन्सी रिस्पॉन्स**

**RC कपल्ड ऍम्प्लिफायरचे फायदे:-**

i. सर्वात कमी खर्चिक मल्टीस्टेज ऍम्प्लिफायर आहे.

ii. या ऍम्प्लिफायरा मध्ये विस्तृत फ्रिक्वेन्सी (Wide Frequency Response) आणि मोठी बँडविड्थ आहे.

iii. उत्कृष्ट ऑडिओ फिडेलिटी (Audio Fidelity) प्रदान करते.

iv. या ऍम्प्लिफायरा मध्ये कोणतीही Core Distortion नाही.]

v. RC कपल्ड ऍम्प्लिफायर कमी फ्रिक्वेन्सी विरूपण (frequency distortion) प्रदान करते.

**RC कपल्ड ऍम्प्लिफायरचे तोटे:-**

i. लोडिंग इफेक्टमुळे ऍम्प्लिफायराची एकूण वृद्धी वाढणे तुलनेने कमी आहे.

ii. कमी दर्जाची प्रतिबाधा जुळणी (Poor Impedance Matching).

iii. कपलिंग कपॅसिटरमुळे लघु फ्रिक्वेन्सी करिता ऍम्प्लिफायर कमी वृद्धी देतो.

**RC कपल्ड ऍम्प्लिफायराचे अनुप्रयोग (Applications):**

i. विद्युत दाब ऍम्प्लिफायर म्हणून मोठ्या प्रमाणावर वापरले जाते.

ii. PA (Public Address System) सिस्टमच्या सुरुवातीच्या टप्प्यात याचा वापर केला जातो.

iii. सीडी प्लेयर, डीव्हीडी प्लेयर्स इत्यादींमध्ये वापरले जाते.

iv. रेडिओ आणि टेलिव्हिजन रिसीव्हरमध्ये देखील वापरले जाते.

**v.** स्टिरिओ ऍम्प्लिफायर मध्ये देखील वापरले जाते.

**3.4.2 ट्रान्सफॉर्मर कपल्ड ऍम्प्लिफायर:**

टू-स्टेज ट्रान्सफॉर्मर कपल्ड ट्रांझिस्टर ऍम्प्लिफायर (Two stage transformer coupled amplifier) मध्ये ट्रान्सफॉर्मर कपल्ड केलेले CE ऍम्प्लिफायर्सचे दोन सिंगल स्टेज असतात. कलेक्टर परिपथ (सर्किट)मध्ये जोडलेल्या ट्रान्सफॉर्मरचे प्रायमरी वायंडिंग कलेक्टर लोड म्हणून कार्य करते. कपलिंग ट्रान्सफॉर्मर $T_1$ चे कार्य म्हणजे बाहेर जाणारा प्रवाह A.C. संदेशला पहिल्या टप्प्याच्या बाहेर जाणारा प्रवाहपासून दुसऱ्या टप्प्याच्या आत येणारा प्रवाहमध्ये जोडणे, तर ट्रान्सफॉर्मर $T_2$ Load $R_L$ ला आउटपुट A.C. सिग्नल प्रवाह जोडते.




**आकृती 3.10- ट्रान्सफॉर्मर कपल्ड ॲम्प्लीफायर्स परिपथ (सर्किट)**

इनपुट सिग्नल ट्रांझिस्टर $Q_1$ च्या बेसवर जोडला जातो. ट्रांझिस्टर $Q_1$ आणि $Q_2$ च्या एमीटर ला जोडलेले बायपास कपॅसिटर $C_E$ हे कमी रेझिस्टन्स करण्यासाठी वापरले जातात. रेझिस्टर $R_1$, $R_2$, $R_E$ आणि कपॅसिटर $C_E$ , D.C. बायसिंग आणि स्थिरीकरण (स्टेबल Q पॉइंट) तयार करतात.

जेव्हा पहिल्या ट्रांझिस्टर $Q_1$ च्या बेसवर इनपुट सिग्नल लागू केला जातो, तेव्हा ते जोडणी ट्रान्सफॉर्मर $T_1$ च्या प्रायमरी वायंडिंग P वर विस्तारित स्वरूपात दिसते. प्रायमरी वायंडिंगवर विकसित झालेला विद्युत दाब नंतर पुढील टप्प्याच्या आत येणाऱ्या प्रवाहमध्ये ट्रान्सफर केला जातो. कपलिंग ट्रान्सफॉर्मर $T_1$ च्या सेकंडरी वायंडिंग (S) द्वारे दुसरा टप्पा देखील त्याच प्रकारे प्रवर्धन करते.

**फ्रिक्वेन्सी रिस्पॉन्स :-**




**]आकृती 3.11- ट्रान्सफॉर्मर कपल्ड ऍम्प्लिफायर फ्रिक्वेन्सी रिस्पॉन्स**

ट्रान्सफॉर्मर कपल्ड ऍम्प्लिफायर मध्ये कमी फ्रिक्वेन्सी तसेच उच्च फ्रिक्वेन्सीवर विद्युत दाब कमी होतो, तर मध्य-फ्रिक्वेंसी रेंजमध्ये तो स्थिर राहतो. एका फ्रिक्वेन्सी लेव्हलवर (fo) विद्युत दाब खुपच वाढते त्याला रेझोनंट राईज असे म्हणतात. आणि नंतर गेन सतत कमी (Gain roll off) होतो.

**ट्रान्सफॉर्मर-कपल्ड ऍम्प्लिफायर्सचे फायदे:**

i. हे दोन टप्प्यांमधील उत्कृष्ट प्रतिबाधा जुळवते (Excellent Impendance Matching).
ii. हे RC कपल्ड ऍम्प्लिफायर पेक्षा जास्त वृद्धी देते (More Gain).

**ट्रान्सफॉर्मर-कपल्ड ऍम्प्लिफायर्सचे तोटे:**

i. कपलिंग ट्रान्सफॉर्मर महाग आणि जड असतात.
ii. फ्रिक्वेंसी प्रतिसाद पूर्णपणे सपाट नाही (No Flat Frequency Response).
iii. हे आऊटपुटमध्ये humming noise देते.

**ट्रान्सफॉर्मर कपल्ड ऍम्प्लिफायराचे अनुप्रयोग (Applications)**

i. प्रतिबाधा जुळणीसाठी (Impendance matching) .
ii. रेडिओ फ्रिक्वेन्सी (RF) संदेशच्या प्रवर्धनासाठी
iii. पावर ऍम्प्लिफायरामध्ये.
iv. लाऊड स्पीकर सारख्या कमी प्रतिबाधा लोडला (Low Impedance Load) जास्त पावरट्रान्सफर करण्यासाठी.

**3.4.3 डायरेक्ट कपल्ड ऍम्प्लिफायर (Direct Coupled Amplifier):-**




**आकृती 3.12- डायरेक्ट कपल्ड ऍम्प्लिफायर**

ट्रान्सफॉर्मरने जोडलेल्या ऍम्प्लिफायर्सना अशी मर्यादा आहे की ते DC संदेश किंवा कमी फ्रिक्वेंसी संदेश (Low Frequency Signals) वाढवू शकत नाहीत. डायरेक्ट कपल्ड ऍम्प्लिफायरच्या वापराने ही मर्यादा दूर होते.

दोन-स्टेज डायरेक्ट कपल्ड ऍम्प्लिफायर मध्ये, पहिल्या स्टेज चा आउटपुट सिग्नल थेट पुढील ट्रांझिस्टर Q2 च्या बेसशी जोडलेला असतो. तसेच या परिपथ (सर्किट) मध्ये कोणताही इनपुट अथवा आउटपुट कपलिंग कपॅसिटर आणि इमिटर बायपास कपॅसिटर वापरलेले नाहीत.

अनुप्रयोग करण्यासाठी इनपुट सिग्नल पहिल्या टप्प्यातील ट्रांझिस्टर $Q_1$ च्या बेसशी जोडलेला असतो. हा इनपुट सिग्नल ट्रांझिस्टर $Q_1$ प्रवर्धित करतो आणि दुसऱ्या टप्प्यातील ट्रांझिस्टर $Q_2$ च्या बेसला लागू केला जातो. ट्रांझिस्टर $Q_2$ सिग्नलचे आणखी प्रवर्धन करतो. प्रवर्धित आउटपुट सिग्नल ट्रांझिस्टर $Q_2$ च्या कलेक्टरला उपलब्ध होतो अशाप्रकारे, डायरेक्ट कपल्ड ऍम्प्लिफायर अगदी कमी फ्रिक्वेंसीच्या कमकुवत संदेशची ताकद वाढवते.

**फ्रिक्वेन्सी रिस्पॉन्स :-**




**Bandwidth=$f_2$**

**आकृती 3.13- डायरेक्ट कपल्ड (डी.सी.) ऍम्प्लिफायर फ्रिक्वेन्सी रिस्पॉन्स**

आकृती 3.13 डायरेक्ट कपल्ड ऍम्प्लिफायराचा फ्रिक्वेन्सी रिस्पॉन्स दर्शवते. हे लक्षात घेतले जाऊ शकते की विद्युत दाब गेन $f_2$ द्वारे दर्शविलेल्या विशिष्ट उच्च वारंवारतेपर्यंत एकसमान (flat) आहे. या वारंवारतेच्या पलीकडे, विद्युत दाब गेन हळूहळू कमी होतो. बेस-टू-इमिटर जंक्शन कॅपॅसिटन्स आणि स्ट्रे कॅपॅसिटन्समुळे वाढीव फ्रिक्वेन्सीमूळे गेन कमी होतो.

**डायरेक्ट कपल्ड ऍम्प्लिफायराचे फायदे:-**

1) कपलिंग कपॅसिटरच्या अनुपस्थितीमुळे, कमी फ्रिक्वेन्सी संदेशा करिता (For Low Frequency Signal) वाढ कमी होत नाही.
2) ऍम्प्लिफायर DC सिग्नल देखील वाढवू शकते.
3) विस्तृत फ्रिक्वेन्सी पट्टा (Large Bandwidth).
4) कपलिंग कपॅसिटरच्या अनुपस्थितीमुळे कमी खर्च होतो.

**तोटे:**

1) आउटपुट सिग्नल वेव्हफॉर्ममध्ये डीसी सिग्नल शिफ्ट असते.
2) उच्च फ्रिक्वेन्सीवर करिता वृद्धी कमी होते.

**अनुप्रयोग :**

1) ऑपरेशनल ऍम्प्लिफायर्स मध्ये वापरतात (Operational Amplifiers).
2) लिनिअर विद्युतदाब रेग्युलेटर मध्ये वापरतात.

**तक्ता क्रं 3.1 मल्टीस्टेज ऍम्प्लिफायरस ची तुलना**

| अ.क्र. | पॅरामीटर | आरसी कपलिंग | ट्रान्सफॉर्मर कपलिंग | डी सी कपलिंग |
|---|---|---|---|---|
| 1 | कपलिंग एलिमेंट | R and C (रेझिस्टर आणि कपॅसिटर) | ट्रान्सफॉर्मर | कपलिंग एलिमेंट वापरत नाहीत |
| 2 | कपलिंग संदेशचे प्रकार | AC सिग्नल | AC सिग्नल | AC and DC सिग्नल |
| 3 | खर्च (cost) | कमी | जास्त | कमीत कमी |
| 4 | जागा आणि वजन (space and weight) | कमी | जास्त | कमीत कमी |
| 5 | फ्रिक्वेन्सी प्रतिसाद (frequency response) | ऑडिओ फ्रिक्वेन्सी (frequency) श्रेणीमध्ये उत्कृष्ट | चांगला नसतो | सर्वोत्तम |
